सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, २३ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २९९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# JDUने पाठिंबा काढला आता भाजपा भाकरी फिरवणार, मणिपूरचा मुख्यमंत्री बदलणार ?

इंफाळ : केंद्रात मोदी सरकारला पाठिंबा देणाऱ्या आणि बिहारमध्ये भाजपाच्या पाठिंब्याने सत्तेत असलेल्या मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जनता दल संयुक्त पक्षाने एक चकीत करणारी कृती केली आहे. जदयूने मणिपूरमधील भाजपा सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. मणिपूरमध्ये जदयूचा फक्त एक आमदार आहे. हा आमदार आधी सत्ताधाऱ्यांसोबत बसायचा आता तो विरोधी बाकावर बसेल. जनता दल संयुक्तच्या या निर्णयामुळे मणिपूरमधील भाजपा सरकारच्या स्थैर्यावर परिणाम होणार नाही. पण मुख्यमंत्री नोंगथोंबाम बिरेन सिंह (एन. बिरेन सिंह) यांच्या विरोधातील नाराजी वाढल्याचा आणखी एक राजकीय संकेत आहे. ताज्या घडामोडीचे निमित्त करुन भारतीय जनता पार्टी मणिपूरमध्ये मुख्यमंत्री बदलण्याचा विचार करण्याची शक्यता आहे.



मणिपूरमध्ये ६० सदस्यांची विधानसभा आहेत. या सभागृहात रालोआचे ४५ आमदार आहेत. यात भाजपाचे ३७, नागा पीपल्स फ्रंटचे पाच आणि तीन अपक्ष आमदार आहेत. तर विरोधात फक्त १४ आमदार आहेत. यात नॅशनल पीपल्स पार्टीचे सहा, काँग्रेसचे पाच, कुकी पीपल्स अलायन्सचे दोन आणि जनता दल संयुक्तचा एक आमदार आहेत. सभागृहातील एक जागा रिक्त आहे.

मणिपूर विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक २०२२ मध्ये झाली. या निवडणुकीत जनता दल संयुक्तने सहा जागांवर विजय मिळवला. पण निवडणुकीनंतर काही महिन्यांतच जनता दल संयुक्तच्या पाच आमदारांनी भाजपात प्रवेश केला. यामुळे भाजपाच्या आमदारांची संख्या ३७ वर जाऊन पोहोचली. या घटनेनंतरही जनता दल संयुक्तने मणिपूरमध्ये भाजपा सरकारचा पाठिंबा काढला नव्हता. पण आता जनता दल संयुक्तने विरोधात बसण्याचा निर्णय घेतला आहे. मणिपूर जनता दल संयुक्तचे प्रमुख क्षेत्रीमायुम बिरेन सिंह (के. बिरेन सिंह) यांनी राज्यपाल अजय कुमार भल्ला यांना पत्र पाठवून पक्षाने विरोधात बसण्याचा निर्णय घेतल्याचे कळवले आहे.

माजी केंद्रीय गृहसचिव असलेल्या अजय कुमार भल्ला यांनी ३ जानेवारी २०२५ रोजी मणिपूरच्या राज्यपालपदाचा पदभार स्वीकारला. यानंतर काही दिवसांनी जनता दल संयुक्तने मणिपूर सरकारचा पाठिंबा काढल्याचे जाहीर केले आहे. जनता दल संयुक्तच्या निर्णयामुळे मणिपूरमधील सरकारच्या स्थैर्यावर परिणाम होणार नाही. बिहार आणि केंद्रात जनता दल संयुक्त आणि भाजपा आजही एकत्र आहेत आणि या दोन्ही ठिकाणी वेगळा विचार करत असल्याचे संकेत जनता दल संयुक्तने दिलेले नाहीत. यामुळे जनता दल संयुक्तचा मणिपूरमधील निर्णय हा मुख्यमंत्र्यांविषयीच्या नाराजीतून आल्याची चर्चा आहे.

मेघालयमध्ये सत्तेत असलेल्या नॅशनल्स पीपल्स पार्टीने मणिपूरमध्ये सत्ता स्थापनेवेळी नोंगथोंबाम बिरेन सिंह (एन. बिरेन सिंह) यांच्या सरकारला पाठिंबा जाहीर केला होता. पण नोव्हेंबर २०२४ मध्ये नॅशनल्स पीपल्स पार्टीने पाठिंबा काढून घेत विरोधात बसण्याचा निर्णय घेतला. मेघालयमध्ये नॅशनल्स पीपल्स पार्टीचे ३२, युनायटेड डेमोक्रॅटिक पार्टीचे १२, भाजपाचे दोन, हील्स स्टेट पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीचे दोन आणि दोन अपक्ष असे ५० आमदार एकत्र आले आणि सरकार स्थापन झाले. या समीकरणात कोणताही बदल झाला नसताना नॅशनल्स पीपल्स पार्टीने मणिपूरमधील नोंगथोंबाम बिरेन सिंह (एन. बिरेन सिंह) यांच्या सरकारचा पाठिंबा काढून घेतला. या घटनेला दोन महिने उलटत नाहीत तोच जनता दल संयुक्तने मणिपूरमधील नोंगथोंबाम बिरेन सिंह (एन. बिरेन सिंह) यांच्या सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. हे करताना जनता दल संयुक्तने भाजपासोबतची इतर कोणतीही राजकीय समीकरणे बदलेली नाहीत. यामुळे नॅशनल्स पीपल्स पार्टी आणि जनता दल संयुक्त यांचे मणिपूरमधील निर्णय हे मुख्यमंत्र्यांच्या कारभाराविषयी नाराजी प्रकट करण्यापुरतेच मर्यादीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# महाराष्ट्रातील घुसखोरांवर कायदेशीर कारवाई करा : गृहमंत्रालय

नवी दिल्ली, २२ जानेवारी : महाराष्ट्रात बेकायदेशीर घुसखोरांवर कडक कारवाई करा असे निर्देश केंद्रीय गृह मंत्रालयाने दिले आहेत. महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक आणि इतर संबंधित संस्थांना बांगलादेश आणि म्यानमारमधून महाराष्ट्रात येणाऱ्या घुसखोरांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

यासंदर्भात शिवसेना (शिंदे गट) उपनेते आणि माजी खासदार राहुल शेवाळे यांनी अमित शाह यांच्याकडे बांगलादेशी घुसखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. या मागणीच्या आधारे गृह मंत्रालयाने सैफ अली खानवरील हल्ल्यानंतर कठोर कारवाई करण्याचे निर्देश जारी केले आहेत. राहुल शेवाळे यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये केंद्रीय गृहमंत्र्यांना पत्र लिहीले होते. यात टाटा सोशल सायन्स इन्स्टिट्यूटच्या अहवालाचा



हवाला देत महाराष्ट्र आणि मुंबईत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या बांगलादेशींवर कारवाई करण्याची मागणी केली होती. टाटा इन्स्टिट्यूटने त्यांच्या अहवालात म्हटले होते की, बांगलादेशी घुसखोर मुंबई आणि राज्याच्या इतर भागात बेकायदेशीरपणे वास्तव्याला आहेत. हे घुसखोर गुन्हेगारी कारवायांमध्ये सामील होऊ शकतात, ज्यामुळे मुंबईच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. काही ठिकाणी त्यांना बनावट मतदार ओळखपत्र देऊन मतदार बनवले जात आहे, जे लोकशाहीला धोका निर्माण करू शकते, असेही या अहवालात म्हटले आहे.

दरम्यान, या धोक्याची झलक सैफ अली खानवरील हल्ल्याच्या माध्यमातून दिसून आली. अभिनेता सैफ अली खानवर त्याच्या राहत्या घरी चाकूने हल्ला केल्याच्या आरोपाखाली एका बांगलादेशी नागरिकाला अटक करण्यात आली. पोलिसांनी सांगितले की, प्राथमिक तपासात असे दिसून आले की, त्या व्यक्तीला आपण एका बॉलिवूड स्टारच्या घरात घुसलो आहोत याची माहिती नव्हती. त्याचा हेतू चोरी करण्याचा होता. हल्लेखोराला ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर रोडवरील हिरानंदानी इस्टेट येथून अटक करण्यात आली. भारतात प्रवेश केल्यानंतर, त्या व्यक्तीने त्याचे नाव शरीफुल इस्लाम शहजाद मोहम्मद रोहिल्ला अमीन फकीर वरून विजय दास असे बदलले. आरोपी, मूळचा बांगलादेशातील झलोकाटीचा रहिवासी असूमन गेल्या ८ महिन्यांपासून मुंबईत राहत होता.

# दिलीप स्वामी यांना उत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कार; विधानसभा निवडणुकीत या कामाबद्दल होतोय गौरव

सोलापूर : छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना निवडणूक आयोगाकडून उत्कृष्ट जिल्हाधिकारी म्हणून पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यासह छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्याही गौरव केला जाणार आहे.



नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत टपाली मतपत्रिका देवाण-घेवाण करण्याचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल औरंगाबादचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. दिलीप स्वामी यांनी छत्रपती संभाजी नगरच्या जिल्हाधिकारी पदाचा पदभार घेतल्यानंतर अत्यंत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या औरंगाबाद लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट काम केल्याचे पाहायला मिळाले आहे.

यासंदर्भात आज मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडून पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. त्यात उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी लोकसभा, उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी विधानसभा, टपाली मतपत्रिका देवाण घेवाणचे उत्कृष्ट नियोजन, मतदान साहित्य प्राप्त करण्याचे नियोजन, उत्कृष्ट मतदार सुविधा, उत्कृष्ट वार्तांकन आणि उत्कृष्ट शासकीय भागीदारी अशा गटात पुरस्कार जाहीर झाले. टपाली मतपत्रिकांची देवाण घेवाण करण्याचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना पुरस्कार जाहिर झाला आहे. दि. २५ जानेवारी, २०२५ हा दिवस देशभरात १५ वा राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राज्यस्तरावरील कार्यक्रम एम.आय.टी. विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमामध्ये राज्यातील लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या अधिकाऱ्यांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.

# जळगावात रेल्वे दुर्घटना, ८ ते १० प्रवाशांचा मृत्यू

## पुष्पक एक्स्प्रेसला आग लागल्याच्या भीतीने प्रवाशांनी मारल्या उड्या; समोरुन येणाऱ्या बंगळुरु एक्स्प्रेसने चिरडल्याने ८ ते १० जणांचा मृत्यू

जळगाव : मुंबईकडे जाणाऱ्या पुष्पक एक्स्प्रेसमध्ये आग लागल्याच्या भीतीने काही प्रवाशांनी चालत्या गाडीतून उड्या मारल्या. मात्र, समोरून येणाऱ्या बंगळुरू एक्स्प्रेसने त्यांना चिरडल्याने सहा ते आठ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना जळगाव जिल्ह्यातील परांडा स्थानकाजवळ घडली आहे.

पुष्पक एक्स्प्रेस मुंबईकडे जात असताना अचानक ब्रेक लावल्यामुळे गाडीच्या चाकांमधून धूर आणि ठिणग्या उडाल्या. या दृश्यामुळे काही प्रवाशांना आग लागल्याची शंका वाटली. घाबरून त्यांनी गाडीतून उड्या मारण्यास सुरुवात केली.

याच वेळी समोरून वेगाने येत असलेल्या बंगळुरू एक्स्प्रेसने या प्रवाशांना धडक दिली. या अपघातात ८ ते १० जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती



समोर आली आहे.

घटनेचे प्रत्यक्षदर्शी बाबा जाधव यांनी सांगितले की, परांडा स्थानकाच्या अगोदर पुष्पक एक्स्प्रेसचा ब्रेक लागल्याने घर्षण झाले आणि आगीच्या ठिणग्या उडाल्या. यामुळे गाडीत असलेल्या प्रवाशांमध्ये भीती पसरली. काहींनी घाबरुन गाडीतून उड्या मारल्या आणि दुर्दैवाने बंगळुरु एक्स्प्रेसने त्यांना चिरडले.

घटनेची माहिती मिळताच मंत्री गिरीश महाजन, जिल्हाधिकारी आणि प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी घटनेची माहिती मिळताच दुःख व्यक्त केले.

ब्रेक लावल्यानंतर धूर आणि ठिणग्या पुष्पक एक्स्प्रेसच्या चाकांमधून उडालेल्या ठिणग्यांमुळे आग लागल्याचा संशय काही प्रवाशांना झाला. घाबरलेल्या प्रवाशांनी चालत्या गाडीतून उड्या मारल्याने आणि त्याचवेळी समोरून आलेल्या गाडीची धडक बसल्याने हा अपघात घडला. बंगळुरू एक्स्प्रेसमुळे प्रवाशांना जोरदार धडक बसली, यात प्रवाशांचा मृत्यू झाला.

रेल्वे अधिकाऱ्यांनी या अपघाताची गंभीर दखल घेतली आहे. मृत्यू पावलेल्या प्रवाशांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. तसेच, या अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

ही दुर्घटना प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न उभे करत असून रेल्वे प्रशासनाने तत्काळ पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील सुनावणी पुढे ढकलली

नवी दिल्ली: राज्यामध्ये गेल्या चार वर्षांपासून २६ महानगरपालिका, २५७ महापालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांमधील निवडणुका प्रलंबित आहे. याबाबत २१ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहेत. राज्यातील जनताही याबाबतच्या निर्णयाबद्दल उत्सुक होती. मात्र ही सुनावणी मंगळवारी झाली नाही. आता ही सुनावणी २८ जानेवारीला होण्याची शक्यता आहे.

तारीख पुढे ढकल्याने साऱ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. न्यायालयात प्रभार रचना, लोकसंख्येतील १० टक्के वाढ धरून निश्चित करण्यात आलेली सदस्य संख्या तसेच ओबीसी आरक्षण यावरून तब्बल ५७ याचिका दाखल आहेत. या याचिकांवर २१ जानेवारीला सुनावणी होणार होती. मात्र ही झालीच नाही. गेल्या चार वर्षांपासून या निवडणुकी रखडलेल्या आहेत. त्यावर सुनावणी होईल अशी अपेक्षा होती. मात्र आता ही सुनावणी पुढे ढकलली आहे.

अनेक कारणांनी या निवडणुका लवकरात लवकर घेणे गरजेचे आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना मुंबई वगळून इतर महानगरपालिकांसाठी त्रिसदस्यी प्रभागरचना केली होती. त्यानंतर आरक्षण सोडतही काढण्यात आली. यानंतर शिंदे सरकार आले आणि त्यांनी पुन्हा चार सदस्यी प्रभाग रचना केली. त्यामुळे आता पुन्हा प्रभाग रचना करावी लागेल तसेच त्यावर हरकती-सूचनांची प्रक्रिया होणे आणि अंतिम प्रभाग रचना होणे यासाठी कमीत कमी ९० दिवस लागू शकतात. यामुळे या निवडणुकांबाबतचा निकाल सर्वोच्च न्यायालयात न लागल्यास त्या ऑक्टोबरमध्ये घ्याव्या लागतील.

# कुटुंब समाज आणि राष्ट्र ही साखळी मजबूत झाली तर राष्ट्राची उन्नती सहजपणे होईल : मोहन पुराणिक

## रा.स्व.संघ विक्रमादित्य प्रभात शाखेचा मकर संक्रांत उत्सव संपन्न

छत्रपती संभाजीनगर : दूरचित्रवाणी वरील मालिकांच्या प्रभावामुळे एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास झाल्याचे तसेच कुटुंबाचे जे घटक ग्रामीण भागात आणि शहरात राहतात त्यांच्यात समन्वय नसल्यामुळे बहुतांश ठिकाणी कुटुंबाची वाताहत झालेली पाहायला मिळते अशी माहिती निवृत्त न्यायाधीश मोहन पुराणिक यांनी दिली ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विक्रमादित्य प्रभात शाखेच्या मकर संक्रांत उत्सवात बोलत होते.विनायक आदर्श हाऊसिंग सोसायटीच्या हनुमान मंदिराच्या प्रांगणात दिनांक २१ जानेवारी रोजी सायंकाळी संपन्न झालेल्या या उत्सवात व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. हिम्मत नरके तसेच हेडगेवार नगर संघचालक अनयजी फणसळकर उपस्थित होते.

मकर संक्रमण उत्सवात बोलताना पुराणिक म्हणाले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने यावर्षीपासून सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन,पर्यावरण,



नागरी कर्तव्य आणि स्व- जागरण या पंचसूत्राच्या आधारे आगामी काळात परिवर्तन घडवण्यासाठी काम करायचे आहे असा निर्णय केला आहे. आपणही सर्वांनी या सर्व विषयात झोकून देऊन काम करावे असे आवाहन त्यांनी केले पुराणिक म्हणाले पर्यावरणाच्या बाबतीत एक साधा नियम आपण सर्वांनी पाळला जो सहज शक्य आहे तो म्हणजे बाजारात भाजी घ्यायला जाताना सर्वांनी कापडी पिशवी सोबत ठेवावी जेणेकरून प्लास्टिकचा वापर टाळता येऊ शकेल.

उत्सवाचे प्रमुख अतिथी डॉक्टर हिम्मत नरके यांनी आपल्या भाषणात मकर संक्रांतीचे महत्त्व सांगितले ते म्हणाले केवळ याच काळात गोड बोलावे असे नाही तर नेहमीसाठीच आपल्या सर्वांमध्ये गोडवा आवश्यक आहे आपल्या बोलण्यात गोडवा असेल समाज जोडला जातो समाज जोडला गेला की आपोआप राष्ट्र जोडल्या जाते

उत्सवाच्या सुरुवातीला विजय मुळे यांनी सांघिक गीत श्रीकांत देशपांडे यांनी अमृतवचन सुभाषित सादर केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजीव जहागीरदार यांनी केले उत्सवाला मोठ्या संख्येत नागरिक आणि महिला उपस्थित होत्या.

# राज ठाकरे तीन दिवसांच्या नाशिक दौऱ्यावर

नाशिक : आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने मनसे अध्यक्ष राज ठाकरे गुरुवारपासून तीन दिवस नाशिक दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते मनसे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार असून, त्याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून आहे.

विधानसभा निवडणुकीत मनसेची महायुतीसोबतची युती फिस्कटली असली, तरी आगामी मनपा निवडणुकीत मनसेला टाळी दिली जाईल, अशी चर्चा आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीदेखील विधानसभेला झालेला पराभव विसरून कामला लागा, अशा सूचना दिल्या आहेत. मुंबईनंतर मनसेसाठी नाशिक महत्त्वाची महापालिका आहे.

मनसेने पहिल्यांदाच राज्यात सत्ता नाशिक मनपात बघितली मात्र त्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला उतरती कळा लागली आणि अंतर्गत गटबाजीने डोके वर काढले आहे. ते पाहता राज ठाकरे यांचा दौरा पक्षासाठी महत्त्वाचा आहे. पक्षाच्या विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी ते संवाद साधणार आहे. तसेच महापालिका निवडणुकीच्या संदर्भात कार्यकर्त्यांना सूचनादेखील करणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना गेल्या वर्षी मार्चमध्ये पक्षाचा वर्धापन दिन व अधिवेशन नाशिकला घेतले होते. परंतु लोकसभा निवडणुका न लढवण्याच्या निर्णयामुळे पक्षात नाराजी पाहायला मिळाली होती.

# राष्ट्रपती भवनातील अमृत उद्यान २ फेब्रुवारीपासून सर्वसामान्यांसाठी खुले

नवी दिल्ली: राष्ट्रपती भवनातील अमृत उद्यान २ फेब्रुवारीपासून सर्वसामान्यांसाठी खुले करण्यात येणार आहे. वसंत ऋतूमध्ये हे उद्यान सर्वसामान्यांसाठी खुले केले जाते. एकूण १५ एकरांवर पसरलेल्या या प्रसिद्ध उद्यानात ८५ हून अधिक प्रजातींची फुले आहेत. यात १०० हुन अधिक प्रकारचे गुलाब आणि ५ हजार हंगामी फुलांच्या ७० विविध प्रजाती आहेत. विविध प्रकारच्या ट्यूलिपसह जगभरातील रंगीबेरंगी फुलांची झाडे आहेत. फुलांव्यतिरिक्त १६० जातींची ५ हजार झाडे अमृत उद्यानात आहेत, यातील काही काही झाडे अनेक दशके जुनी आहेत.

राष्ट्रपती भवनात ६ ते ९ मार्च दरम्यान 'विविधता का अमृत महोत्सव'आयोजित केला जाणार आहे. या वर्षी अमृत महोत्सवात दक्षिण भारतातील समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि वैशिष्ट्यपूर्ण परंपरांचे दर्शन घडवले जाणार आहे.

दरवर्षी देशभरातील ५ ते ६ लाख लोक अमृत उद्यानाला भेट देत असतात. त्यानुसार अमृत उद्यान २ फेब्रुवारी ते ३० मार्च २०२५ या कालावधीत जनतेसाठी खुले राहणार आहे. सोमवार वगळता आठवड्यातील सर्व दिवस सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत लोक उद्यानाला भेट देऊ शकतात. मात्र उद्यान ५ फेब्रुवारीला दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठीच्या मतदानामुळे, २० आणि २१ फेब्रुवारीला राष्ट्रपती भवनात आयोजित एका परिषदेमुळे आणि १४ मार्च रोजी होळीच्या निमित्ताने बंद राहील.

# ढोरकीन मंडळमध्ये रॉयल्टीच्या नावाखाली हजारों ब्रास मुरुमाचे उत्खनन

# जास्तीचा मुरुम उखाण केल्याने कारवाई करणार : मंडळाधिकारी सीमा भोसले

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २२ जानेवारी (अरुण देविदास) : पैठण तालुक्यातील बिडकीन हद्दीत डीएमआयसी प्रकल्प उभारत असून अनेक लहानमोठ्या कंपनीचे बांधकाम सूरु केलेले असून यासाठी लागणारा मुरूम,दगड, माती असे नैसर्गीक गौण खनिज बांधकामासाठी लागत असल्याने बिडकीन शेजारी असलेल्या तोंडोळी लोहगाव मंडळ मधील तोंडोळी गावालगत जैनपुर मध्ये असलेले गट नंबर ८०/८१ मधील शासकीय पाझर तलावमधून मागील १४ जानेवारी पासुन फक्त २०० ब्रास मुरूमाची बांधकामासाठी





तोंडोळी शिवारातील तलाव या ठिकाणी येऊन पाहणी करून पंचनामा चे अहवाल पैठण तहसीलदार यांना पाठवल्याचे त्यांनी सांगितले आहे जर रॉयल्टी च्या नावाखाली जास्त गौण खनिज उत्खनन केलेला असल्याचे निदर्शनात आले आहे, तरी यांच्या वर कारवाई करण्यात येईल असे त्यांनी पत्रकारांना बोलताना सांगितले आहे २०० ब्रास च्या वर जर मुरुम गेले असेल तर नक्कीच महसूल प्रशासन कारवाई करणार असेही त्यांनी सांगितले आहे.

–मंडळ अधिकारी ढोरकीन सीमा भोसले , तलाठी शितल निकम

पैठण तहसील मधून गौण खनिज उत्खनन करण्यासाठी रॉयल्टी काढण्यात आली असून आतापर्यंत या पाझर तलावातील अंदाजे १५०० ते २००० ब्रास मुरुमाचे अवैधरित्या रॉयल्टीच्या नावाखाली अवैध उत्खनन सर्रासपणे दिवसरात्र नियमबाह्य पद्धतीने शासनाची व महसूल विभागाची दिशाभूल करून मुरूम माफिया करताना दिसुन येत आहे. पाझर तलावाकडे आजपर्यंत नियमानुसार तलाठी किंवा मंडळ अधिकारी यांनी कुठलीही भेट देउन पाहणी न करता रॉयल्टी नुसार उत्खनन झालेले मोजमाप करताना दिसून आलेले नाही त्यामूळे नैसर्गिक पाझर तलाव, तळे, ओढे यांची चाळणी झालेली दिसत आहे. बिडकीन व ढोरकीन मंडळ मध्ये दिवसरात्र गौण खनिज अवैधरित्या १०० किंवा २०० ब्रासच्या रॉयल्टीच्या नावाखाली तहसील मध्ये नंबर देण्यात आलेल्या वाहनाव्यतिरिक्त दुप्पट वाहने हायवा, जेसीबी उत्खनन करताना व वाहतूक करताना दिसून येत आहे तीन दिवसांपूर्वी अशाच अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनाखाली एका हरणाचा जागीच अपघातात चिरडून मृत्यू झाला आहे. आयटी धारकावर काय कारवाई होणार का हे बघणे लक्षणे ठरणार आहे.

मंडळ अधिकारी व तलाठी यांची प्रतिक्रिया घेतली असता त्यांनी सांगितलं की रात्री बे रात्री त्या जैनपुर तलाव या ठिकाणी अवैधपणे गौण खनिज मुरूम हायवाच्या साहाय्याने चोरी जात होते आणि त्यासाठी आम्ही तहसील कार्यालयाला अहवाल पाठवले होते ,वारंवार पत्र पाठवले आहे नक्कीच कारवाई करणार आहे, व आम्ही पथक नेमलेले आहे आता जी २००ब्रास ची रॉयल्टी दिलेली आहे या रॉयल्टी च्या आधीच त्या तलावा मधून अवैधपणे मुरूम चोरी गेलेला आहे अशी माहिती ढोरकीन मंडळाधिकारी व तलाठी यांनी दिली आहे.

## शपथ 'बेटी बचाओ बेटी पढाओ'ची महिलांच्या बरोबरीच्या सहभागानेच होईल देशाची प्रगती- दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(जिमाका) - प्रत्येक क्षेत्रात महिला कार्यरत आहेत. मात्र एवढ्यावरच न थांबता आता प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग हा पुरुषांच्या बरोबरीने व्हायला हवा, तरच देशाची खऱ्या अर्थाने प्रगती होईल. मुलींचा घटता जन्मदर ही एक सामाजिक समस्या असून ती सोडविण्यासाठी प्रत्येकाने कटीबद्ध होणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले. यावेळी उपस्थितांना बेटी बचाओ बेटी पढाओ ची शपथ देण्यात आली.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात आज 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेस १० वर्षपूर्ती झाल्यानिमित्त महिला व बालविकास विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, महिला व बालविकास विभागाच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुवर्णा जाधव, जिल्हा महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी रेश्मा चिमंद्रे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, जिल्ह्यात मुलींचा घटता जन्मदर ही चिंतेची बाब आहे. गर्भलिंग निदान तपासणी, कन्याभ्रूण हत्या, बालविवाह सारख्या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी कायदे असले तरी सर्वसामान्य लोकांपर्यंत याबाबतचे प्रबोधन, जनजागृती पोहोचून लोकशिक्षण व्हायला हवे. हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे. समाजाचे संतुलन साधण्यासाठी महिला व पुरुषांचे प्रमाण योग्य हवे. महिलांचा सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने सहभाग हवा, तरच देशाची प्रगती होईल. शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रत्येक उपक्रमाचे इष्ट परिणाम दृष्टिपथास यावे. हे अभियान प्रत्येक ग्रामपंचायतस्तरापर्यंत नेण्यात यावे,असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी प्रयत्न करावे,असे आवाहनही त्यांनी केले.

श्रीमती सुवर्णा जाधव यांनी प्रास्ताविक केले तर श्रीमती रेश्मा चिमंद्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले. त्यानंतर सर्व मान्यवरांनी फलकावर स्वाक्षरी करुन आपला अभियानातील सहभाग नोंदविला.

## विभागीय आयुक्तांकडून १०० दिवसाच्या आराखड्याबाबत आढावा

### १०० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार कार्यालयांनी कार्यवाही करावी- विभागीय आयुक्त दिलीप गावडे

छत्रपती संभाजीनगर दि.२२: राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांकरिता आगामी १०० दिवसांमध्ये संकेतस्थळ, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयी व सुविधा ,गुंतवणूक प्रसार व क्षेत्रीय कार्यालयांना भेटी या मुद्यांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश यापुर्वीच शासनाने दिले आहेत. विभागातील सर्व क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी कृती आराखड्यानुसार कार्यवाही करावी, अशा सूचना आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालय येथे शासनाच्या सर्व विभागाच्या १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी आराखडयानुसार सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. बैठकीस अपर आयुक्त डॉ. अरविंद लोखंडे, अपर आयुक्त महसूल श्रीमती नयना बोंदार्डे, रोजगार हमी योजनेचे सह आयुक्त अनंत गव्हाणे, विकास विभागाच्या उपायुक्त सीमा जगताप आदींसह विभागातील जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. गावडे म्हणाले, विभागातील सर्व कार्यालयांनी आपल्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवावी. कार्यालयाचे संकेतस्थळ हाताळण्यास सुलभ असावे. संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, मधील तरतुदींनुसार जास्तीत जास्त माहितीचे स्वयंप्रकटीकरण गरजेचे आहे. वेबसाईटच्या माध्यमातून नागरिकांना सेवा उपलब्ध होईल याबाबत काळजी घ्यावी. तसेच नागरिकांना मिळणाऱ्या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रचलित कामकाजाच्या पद्धतींचे पुनर्विलोकन करुन प्रशासकीय कार्यपद्धतीमध्ये किमान दोन सेवा अतिशय सुलभ पध्दतीने द्याव्यात. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरीता सातत्याने विभागाकडून प्रयत्न गरजेचे असल्याचे श्री गावडे म्हणाले.

आपल्या कार्यालयात स्वच्छता राहील, याची प्रत्येकाने दक्षता घ्यावी, असे निर्देश देत विभागीय आयुक्त श्री गावडे म्हणाले, प्रचलित नियम, कार्यपद्धतीप्रमाणे शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये निंदणीकरण, नष्टीकरण व निर्लेखनाची प्रक्रिया प्राधान्याने व निरंतरपणे राबविण्यात यावी. कार्यालयांमध्ये व कार्यालयांच्या आवारात असणारे अभिलेख निंदणीकरण करुन तपासाअंती आवश्यक नसल्यास नष्ट करण्यात यावेत. तसेच, सर्व अभिलेखांचे शासन निर्णयाप्रमाणे वर्गीकरण करा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. नागरिकांकडून कार्यालयास प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे (आपले सरकार, पीजी पोर्टल) तत्परतेने निपटारा करण्यात यावा तसेच याची १ जानेवारी, २०२५ पूर्वीची प्रलंबितता शून्य करावी. सर्व अधिकाऱ्यांनी कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांच्या भेटीसाठी आठवड्यातील दैनंदिन वेळ राखून ठेवावी व तसे फलक कार्यालयामध्ये दर्शनी भागात लावण्यात यावेत. दौऱ्यावर असल्यास अभ्यागतांना भेट देण्यासाठी अन्य अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर लोकशाही दिनाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यात यावी. तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर निवारण करता येतील असे प्रश्न,समस्या तत्परतेने सोडविले गेल्यास नागरिकांना शासनाकडे पाठपुरावा करावा लागणार नाही.असेही त्यांनी सांगितले.

## पुजा चव्हाण यांच्या कवितांची वंडर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसाठी निवड



तभा वृत्तसेवा
कन्नड दि.२२ जानेवारी - तालुक्यातील बनशेंद्रा येथील नवोदित कवियत्री पुजा प्रमोद चव्हाण यांची नाशिक येथील ज्ञानवर्धिनी विद्याप्रसारक मंडळातर्फे इंटरनॅशनल इव्हेंट वंडर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड साठी त्यांच्या कवितांची निवड करण्यात आली आहे. पुजा चव्हाण त्यांना नाशिक येथे निमंत्रित कवी म्हणून आमंत्रित केले होते यावेळी ज्ञानवर्धिनी विद्याप्रसारक मंडळातर्फे त्यांचा सन्मान करून सत्कार करण्यात, स्वतःची स्वतःशी या कवितेचे सादरीकरण केले दरम्यान ज्ञानवर्धिनी विद्याप्रसारक मंडळातर्फे अध्यक्ष राजेश भुसारे यांच्या शुभहस्ते पुजा चव्हाण यांना सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेचे सहसचिव एड डॉ अंजली पाटील , गोपाळ पाटील , एड एल जी उगावकर आदी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती .

## बिडकीन मधून जड वाहतुकीला बंदी असूनही सूरु -जिव्हीपीआर कंपनीचे असुरक्षित नियमबाह्य काम सूरु

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २१ जानेवारी: छत्रपती संभाजीनगरला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीचे काम एमजीपी कडून जीव्हीपीआर इंजिनिअर्स लिमिटेड ठेकेदार कंपनीला देण्यात आलेले आहे. या ठेकेदार कंपनीचे खोदकाम करण्यासाठीं असुरक्षितता दिसून येत आहे. अनेक ठिकाणी दिशा दर्शक फलक नसून खोदलेल्या जलवाहिनीसाठी अनेक जन खड्ड्यात पडून अपघात झालेले आहे. हे अपघात टाळण्यासाठी व जलवाहिनी टाकण्यासाठी अडथळा होऊ नये म्हणून विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगर पालिका आयुक्त ग्रामीण पोलिस अधीक्षक,महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी, एनएचएआय रस्त्याचे अधिकारी यांची बैठक होऊन जडवाहतूक बिडकीन



व गेवराईमधून वळविण्यात आली आहे. चिकलठाणा व बिडकीन ग्रामीण पोलिसांनी स्थानिक वाहनधारक यांना गेवराई बिडकीन मधून प्रवेश साठी मोजकेच सवलत पास देण्यात आले होते.मात्र त्या पासची वाहनधारकांनी फक्त आठवडाभर अंमलबजावणी केली व ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या पासला केराची टोपली दाखवली.२६ जानेवारी पर्यंत ग्रामीण पोलिसांनी लहान चारचाकी कार तीन चाकी, दुचाकी व रुग्णवाहिका या वाहनासाठी परवानगी दिली होती व जड वाहतुकीला पूर्णपणे बिडकीन मधून जाण्यासाठी बंदी केली होती तरी सुद्धा दररोज जड वाहतूक करणारी वाहने दिवस रात्र चालू आहे. बिडकीन व गेवराई मधून सर्रासपणे जड वाहतूक सुरू असून दररोज छोटे-मोठे अपघातातून अनेकांना आपले प्राण गमवावे लागत आहे.मागील एका वर्षात अनेकांचा जीव अपघात होऊन पैठण बिडकीन रोडवर गेल्याने व काहींना कायमचे अपंगत्व झाल्याने अनेकांचे संसार मोडल्याने मागील तीन दिवसांमध्ये अपघात होऊन दोन जणांना आपल्या जीव गमवावा लागला याकडे प्रशासन लक्ष कधी देणार ? अनेक जीवांची किंमत जलवाहिनीच्या कामासाठी मोजावी लागत आहे.

## प्रजासत्ताक दिनःमुख्य शासकीय सोहळा देवगिरी मैदानावर

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(जिमाका) - देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन समारंभाचा जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा पोलीस आयुक्तालयाच्या देवगिरी या मैदानावर रविवार दि.२६ रोजी सकाळी सव्वा नऊ वा. आयोजीत करण्यात आला आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. या कार्यक्रमास सर्व स्वातंत्र्यसेनानी, लोकप्रतिनिधी, अधिकारी- कर्मचारी, विद्यार्थी आदींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

मुख्य शासकीय समारंभात लोकांना सहभागी होता यावे यासाठी सकाळी साडेआठ ते दहा यावेळात ध्वजारोहणाचा इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजीत करण्यात येऊ नये. त्यांनी हे समारंभ सकाळी साडेआठ पूर्वी किंवा १० वाजेनंतर करावे,असे अपर आयुक्त सामान्य प्रशासन डॉ. अरविंद लोखंडे यांनी कळविले आहे.

## उपजिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी व सीजर सुविधा उपलब्ध करण्यात याव्या



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२२: येथील उप जिल्हा रुग्णालयात आज जिजाऊ महिला फाऊंडेशन अध्यक्षा सुवर्णा जाधव तसेच सर्व सदस्य यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुदाम लगास यांना निवेदन देण्यात आले. गंगापूर जिल्हा रुग्णालय येथे गरोदर महिला साठी सोनोग्राफी सुविधा तसेच सिजर सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी करण्यात आली तसेच वैद्यकीय अधिक्षक यांना गंगापूर शहरातील सोनोग्राफी प्रायवेट सेंटर येथे अतिशय जास्त प्रमाणत पैसे घेतले जातात म्हणून गरीब कुटुंबांना ते परवड्या सारखे नसते त्यामुळे उप जिल्हा रुग्णालय येथे सुरू करावे या मागणीसाठी निवेदन देण्यात आले. यावेळी जिजाऊ महिला फाउंडेशन च्या अध्यक्षा सुवर्णा जाधव,रेखा राजपूत,संगीता वाघ,सुनीता सोळके ,शीला जाधव, साध्ये आदी उपस्थित होत्या.

## एनएचसी फूड्स लिमिटेडने नफ्यात ३८४टक्के वाढ नोंदवली

मुंबई : एनएचसी फुड्स लिमिटेड विविध कृषी उत्पादने, कमोडिटी आणि मसाल्यांच्या प्रमुख निर्यातदाराने ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाहीचे आणि नऊ महिन्यांचे आर्थिक निकाल जाहीर केले आहेत.३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीत, कंपनीचा पीएटी ३८४टक्के वाढून रु. २०८.३३ लाख रुपये नोंदवला आहे, जो मागच्या वर्षी ह्या कालावधीत ४३.०३ लाख होता. ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीतील कामकाजातील आवक ५८टक्के वाढून ७३५२.९७ लाख नोंदवली, जी गेल्या वर्षी ह्या कालावधीत ४६४९.६९ लाख होती.३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांसाठी, कंपनीचा पीएटी ३८४ टक्के ने वाढून ६१४.३० लाख पहोंचाला आहे, जो गेल्या वर्षी ह्या कालावधीत १२६.८८ लाख होता. ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांतील कामकाजातील महसूल ६४% वाढून २१,४२० लाख रुपये नोंदवला आहे जो मागच्या वर्षी १३,०६२ लाख होता.

## कै. बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव १२ वे वार्षिक स्नेह संमेलन संपन्न

## संवाद बाल विद्यार्थ्यांना मोबाईल व टिव्ही पासून लांबच ठेवा : ज्योतीताई काळे



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२२ जानेवारी

मी एक आजी आहे माझ्या घरात नांत सुध्दा आहे.मी व नानासाहेब तीचा खुप खुप लाड करतो.नित्य नियमित तीची शाळेत जाण्यासाठी तयारी करून देत असतो गत दिवसांत आजारी पडल्याने तीला आम्ही तज्ञ डॉक्टरांकडे घेऊन गेलो असता औषधी उपचार झाले वर ते डॉक्टर म्हणाले तूमची नात एकदम सुदृढ आहे ती नक्कीच टिव्ही आणि मोबाईल बघत नसावी म्हणून ती खुपच हुशारही असल्याचे मला बोलतांना जानवले,संमेलनात आपल्या बाल विद्यार्थांचे कला - कर्तब - नृत्य - नाटीका बघण्यासाठी पालक मोठ्या प्रमाणावर आले आहेत. आपनही बाल विद्यार्थ्यांना या दोन साधनांपासुन दुरच ठेवा संवाद साधतांना ज्योतीबाई रंगनाथराव काळे अध्यक्षा शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल ह्या दि.२१ मंगळवार रोजी म्हणाल्या.

स्कूल कडून सालाबादप्रमाणे यंदाही १२ वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले होते.मंचावर डॉ. संजय भोळ कार्यक्रमाचे उद्घाटक,डॉ.राजेश यादव,राजू पाटील,संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,रवींद्र काळे शहराध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस सोयगाव,डॉ. दादासाहेब पवार,राजेंद्र काळे कॉंग्रेस पक्ष तालुका अध्यक्ष, कवी माणिक सोनवणे,कृष्णा पाटील जुनघरे,अजय नेरपगारे आदी होते. उपस्थित पालकांसोबत सौ. काळे यांनी संवाद साधला पुढे म्हणतात की सोयगाव शहराला पुर्वी पासुन नाट्य परंपरा आहे. पुरातन श्री राम मंदीर येथे लोटन पाटील गृहस्थ यांनी अनेक अनेक नाट्यांचे सादरीकरण केलेले आहे. हा वारसा आजही गावातील मंडळी चालवत आहे.त्यामुळे सोयगाव शहराला महाराष्ट्रात नाट्य पंढरी म्हणून संबोधीत केल्या जाते.अनेक लेखक साहित्यिक,कलाकार नाट्य पंढरी विषयावर आज पिएचडी करत आहे.विद्यार्थांच्या अंगी अभ्यास हा असलाच पाहीजे त्याच सोबत जगात काय चालले आहे त्याच ज्ञान ही हव व्यवहारीक ज्ञान,सामाजिक जान यांची सुध्दा जोड असने ही काळाची गरज आहे.माझ्या शाळेत वर्ष भरातील अभ्यासाचा ताण हा विद्यार्थांच्या डोक्यातुन एक दिवस का होईना कमी व्हावा त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना ओळखुन कला गुणांना वाव मिळावा म्हणूनच सालाबादप्रमाणे यावर्षी सुध्दा स्नेह संमेलन आयोजित केले असून शेती प्रधान असलेल्या सोयगावसह तालुक्यातून विद्यार्थांचे पालकही मोठा वेळ काढून आपल्या पाल्याला प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांचे कौतुक करण्यासाठी पेंडाल मध्ये जमलात,मी पण संपुर्ण कार्यक्रम बघनार कारण मी सुद्धा आजी असुन सर्व नातवाचे कौतुक करणार आहे असेही पालकांशी संवाद साधतांना सौ.काळे म्हणाल्या.

**प्रथम स्वागत गित,ओ माय फ्रेंड गणेशा, सुरवात झाली वर्ग सातवी वर्ग विठ्ठल विठ्ठल,आठवी रिमिक्स सॉग,दहावी बेखाब आझाद या गाण्याना रशिक आणि प्रेक्षकांनी भरभरुन दाद दिली बाल कलाकारांसह तरुनाई थीरकली व मंत्रमुग्ध होत ठोका धरून नाचली पस्तीस विविध नाट्य कला,नाटक,कॉमेडी,हिंदी सॉग,फ्रेंन्डशिफ डॉन्स,कोळी नृत्य,रिमिक्स गाणे आदींचे अगदी उत्कृष्ट सादरीकरण बाल कलाकारांकडून करण्यात आले,सिनियर केजी,वर्ग १ ते १० वी च्या विद्यार्थी आणि विद्यार्थिंनींनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.दरम्यान सैराट मराठी गितांवर विद्यार्थांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी - शिक्षिका कार्यक्रम यशस्वी झाल्याने मनसोक्तपणे होते नाचले याच वेळी दहावी ज्ञानार्जन घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भोजनदान देण्यात येवून सागता करण्यात आली.**

हा कार्यक्रम यशस्वीरित्या करण्यासाठी शाळेचे संस्था प्रतिनिधी कमलेश काळे,मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस, मार्गदर्शक दादासाहेब पवार,उप मुख्याध्यापक सागर घाटे, सह सर्व शिक्षक,शिक्षकेतर,कर्मचारी वृंद यांनी या कार्यक्रमास मोलाचे सहकार्य केले होते.

## एमजीएममध्ये तीन दिवसीय बूटकॅम्प यशस्वीपणे संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.२१ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लीगल स्टडीज अँड रिसर्च तर्फे आईन्स्टाईन सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय बूट कॅम्पमध्ये विविध महाविद्यालयांतील सुमारे २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या शिबिरामुळे भारतीय संविदा अधिनियम आणि त्याच्या व्यावहारिक पैलूंसंदर्भात विद्यार्थ्यांना उपयुक्त ज्ञान मिळाले.

शिबिराचे उद्घाटन कंपनी सचिव, लेखापाल गौतम नंदावत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी सध्याच्या कायद्याच्या भारतीय संविदा अधिनियमाचे महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात येत असताना कौशल्य वाढविणे आवश्यक असल्याचे सांगितले.

शिबिरातील पहिल्या दिवशी दोन उपयुक्त सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ॲड. सागर विद्वांस यांनी लेबर ॲक्टच्या दृष्टिकोनातून कॉंट्रॅक्टचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांच्या सत्रामुळे लेबर कॉंट्रॅक्ट आणि त्याचे कामगार व मालकांवर होणारे परिणाम यावर सखोल करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी ॲड.प्रमोद पाटणी यांनी पहिल्या सत्रात कॉंट्रॅक्टचे विविध प्रकार आणि त्याचे आवश्यक घटक यावर सविस्तर माहिती दिली. या सत्राने विद्यार्थ्यांना कॉंट्रॅक्टच्या मसुद्याची गुंतागुंत समजून घेण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ.अनघा पेडगावकर यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) वापरून कॉंट्रॅक्टसंदर्भातील प्रश्न आणि त्याचा उपयोग यावर सत्र घेतले. या चर्चेने विद्यार्थ्यांना डिजिटल युगातील कायदेशीर क्षेत्राचे भविष्य समजून घेण्यासाठी प्रेरित केले.

शिबिराच्या शेवटच्या दिवशी सीएस नेलाभ, सीएस खुशबू आणि सीएस नचिकेत यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. त्यांनी कॉंट्रॅक्ट कायद्याशी संबंधित प्रश्नांची उत्तरे दिली.हा बूटकॅम्प यशस्वी करण्यासाठी डॉ. झरताब अंसारी, ॲड.रीना मंधानी, सीए कोमल मुठा, आणि मनीष दुबे व टीमने आपले योगदान दिले.

हे तीन दिवसीय शिबिर विद्यार्थ्यांना कॉंट्रॅक्ट ड्राफ्ट करण्यासाठी कौशल्य शिकवले तसेच उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांसोबत नेटवर्किंगची संधीही प्रदान केली. स्कूल ऑफ लीगल स्टडीज अँड रिसर्चच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या बूटकॅम्पमुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत झाली.

## ५०० आयशर प्रो ६०५५ एलएनजी ट्रक पुरवण्याचे समजुतदार करार

पुणे :वोल्वो ग्रुप आणि आयशर मोटर्स यांच्यातील संयुक्त उपक्रम वीई कमर्शियल व्हीकल्स लिमिटेड ने भारत मोबिलिटी ग्लोबल एक्सपो २०२५ दरम्यान बैद्यनाथ एलएनजी सोबत एक ठराविक करार केला आहे. या करारानुसार, बैद्यनाथ एलएनजी प्रायव्हेट लिमिटेड आणि आयशर एकत्र ५०० आयशर प्रो ६०५५ एलएनजी ट्रक विकसित करणार आहेत.हा करार, नागपूरमध्ये २६ ऑगस्ट २०२४ रोजी बैद्यनाथ एलएनजी स्टेशनच्या उद्घाटनावर केलेल्या प्रारंभिक कराराचा पुढील टप्पा आहे, ज्यात मान्यवर रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री श्री नितिन गडकरी यांनी आयशर प्रो ६०५५ एलएनजी ट्रक्सच्या पहिल्या खेपाला हिरवी झंडी दाखवली होती.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. २४/२०२५

अर्जदार : १) मंगलबाई रावसाहेब घायवट, वय ७३ वर्षे, धंदा, घरकाम, रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) संतोष रावसाहेब घायवट, वय. ४९ वर्षे, धंदा, शेती, रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) सचिन रावसाहेब घायवट, वय. ४७ वर्षे, धंदा, शेती, रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) उज्वला शशिकांत आगवान, वय ४४ वर्षे, धंदा. घरकाम, रा. शिर्डी ता. राहता जि. अहमदनगर

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. जी. बी. चव्हाण व ॲड. एस.एस. बनसोडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, रावसाहेब अमृता घायवट हे दि. २४/०८/२०२४ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर येथे मयत झालेला आहे. अर्जदार क. १ ते ४ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे रावसाहेब अमृता घायवट यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मुले असून अर्जदार क. ४ ही विवाहीत मुलगी आहे या व्यतिरिक्त मयत रावसाहेब अमृता घायवट यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय / निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रकरणात पुढील तारीख २४/०२/२०२५ करिता हे जाहीर प्रगटन

दिनांक :- २२/०१/२०२५

**आदेशावरून**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.५१/२०२५

अर्जदार : १) लक्ष्मीबाई भ्र. रावसाहेब घोडके, वय ६४ वर्षे धंदा. घरकाम रा. सिध्दपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) अशोक रावसाहेब घोडके, वय ४८ वर्षे, धंदा शेती रा. सिध्दपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) गजानन रावसाहेब घोडके, वय ४६ वर्षे, धंदा शेती रा. सिध्दपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सुरेखा भ्र. कचरु बोचरे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम रा. खरवंडी ता. नेवासा जि. अहिल्यानगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एम.व्ही. कसाने यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्त्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.४ ही त्यांची बहिण आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे रावसाहेब रामभाऊ घोडके हे मौजे सिध्दपुर ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०३/०१/२०२३ रोजी मौजे सिध्दपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत रावसाहेब रामभाऊ घोडके यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ हे मुले व अर्जदार क्र.३ ही मुलगी असे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे,

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २२/१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

पुढील तारीख ०७/०१/२०२५

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, सह दिवाणी न्यायालय क. स्तर यांचे न्यायालय, कन्नड**

दि. कि. अर्ज. नंबर अ४/२०२४

अर्जदार : १. जयकुमार पि. रमेश वाघ वय- ३५ वर्ष, धंदा- मजुरी रा. वैतागवाडी, पिशोर ता. कन्नड, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद). २. सायली पि. रमेश वाघ वय- २७ वर्ष, धंदा-शिक्षण रा- शिवाजी नगर, पिशोर ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद).

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण/दावा : हिंदु वारस कायद्यान्वये अर्जदारांना वारस / लिगल हेयर प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरिल अर्जदार क्र. १ ते २ यांनी ऍड जे. टी. बनसोडे यांचे मार्फत मा. दिवाणी न्यायाधिश दिवाणी न्यायालय क. स्तर यांचे न्यायालय, कन्नड येथे लिगल हेयर सर्टिफिकेट (वारसाचे प्रमाणपत्र) करीता अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र १ ते २ हे मयत रमेश बंडू वाघ याचे एकमेव कायदेशिर वारस आहे. मयत नामे रमेश बंडू वाघ यांचे निधन दि. १७/०४/२०२३ रोजी मौजे नाचनवेल, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे राहत्या घरी झाला असुन अर्जदार क्र. १ ते २ यांना शासकीय निमशासकिय कामांकरीता लिगल हेयर सर्टिफिकेटची (वारसाचे प्रमाणपत्र) आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार क्र १ ते २ यांनी मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, दिवाणी न्यायालय क. स्तर यांचे न्यायालय, कन्नड येथे लिगल हेयर सर्टिफिकेट (वारसाचे प्रमाणपत्र) मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी अर्जदार क्र. १ ते २ यांच्या हक्कात लिगल हेयर सर्टिफिकेट (वारसाचे प्रमाणपत्र) पारीत करण्यास ज्या कुणास काही ऊजर आक्षेप, हरकत असेल अशांनी सदरच्या जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाले पासुन ३० दिवसांच्या आत ऊजर, आक्षेप, हरकत मा. न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहुन नोंदवावा. मुदतीनंतर आलेला ऊजर आक्षेप, हरकत ग्राह्य धरला जाणार नाही व अर्जदार क्र १ ते २ यांच्या हक्कात लिगल हेयर प्रमाणपत्र / वारस प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी करीता हे जाहीर प्रगटन.

सबब आज दिनांक १३/१/२०२५ रोजी सही व शिक्क्यानीशी दिले.

क्लर्क/स्वाक्षरीत — न्यायालयीन अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय क. स्तर यांचे न्यायालय, कन्नड

# एमजीएममध्ये सहा दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.२२ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कुल ऑफ बेसिक अँड अप्लाईड सायन्सेसच्या वतीने सोमवार, दिनांक २७ जानेवारी २०२५ ते शनिवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२५ दरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत 'मटेरियल सिंथेसिस अँड अनॅलिटीकल टेक्निक्स' (NWMSAT - 25 ) या विषयावर सहा दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या कार्यशाळेत विषयतज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी होऊ शकणार आहेत. या कार्यशाळेमध्ये सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करणे आवश्यक असून इच्छूकांनी sbas.mgmu.ac.in या संकेतस्थळास भेट देऊन आपल्या नावाची नोंदणी करावी, असे संयोजकांकडून आवाहन करण्यात आले आहे. नावनोंदणी करण्याची शेवटची तारीख शनिवार, दिनांक २५ जानेवारी २०२५ असणार आहे.

या कार्यशाळेस कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख, संयोजक प्रा.डॉ. के. एम.जाधव, सहसंयोजक डॉ. क्रांती झाकडे, विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित असणार आहेत. या कार्यशाळेत खालील मान्यवर उपस्थित राहत संवाद साधणार आहेत.

१. डॉ.सी.डी.लोखंडे, डी. वाय. पाटील विद्यापीठ कोल्हापूर (विषय : थीन फिल्म प्रिपरेशन टेक्निक)

२. प्रा.एम.एस.जोगड, कलबुर्गी, कर्नाटक (ग्लास अँड ग्लास - सिरॅमिक्स प्रिपरेशन टेक्निक )

३. श्री.निलेश कुलकर्णी, टीआयएफआर, मुंबई ( एक्स रे डिफ्रॅक्शन टेक्निक )

४. डॉ.विनोद कुमार, अर्कालॉजिकल विभाग, छत्रपती संभाजीनगर ( रमण स्पेक्टरोस्कोपी टेक्निक)

५.डॉ.मकरंद कुलकर्णी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ( एफटीआयआर अँड एनएमआर टेक्निक)

६. श्रीमती.भाग्यश्री चाळके, टीआयएफआर, मुंबई, (स्कॅनिंग इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपी टेक्निक)

७. डॉ.बालाजी बिराजदार, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली (स्कॅनिंग इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपी टेक्निक)

विद्यार्थी आणि संशोधकांना या कार्यशाळेच्या अधिक माहितीसाठी ारहरवळज्ञासर्ी. रल.ळप या ईमेलवर अथवा ९७६४९४०१६४ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीमध्ये डॉ.मानसी महाडीक, डॉ. गणेश पवार, डॉ. निकेशकुमार इंगळे व सर्व संबंधित प्राध्यापक काम करत आहे.

# सोयगाव-शेंदुर्णी-हळदा रस्त्याच्या कामासाठी सोयगावला तासभर रस्ता रोको; सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आश्वासन नंतर माघार



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ जानेवारी : सोयगाव-शेंदूरणी-हळदा रस्त्याचे काम नित्कृष्ट दर्जाचे होत आहे रस्ता गुणवत्ता पूर्वक होत नाही या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे.त्यामुळे हा रस्ता आधीच मृत्यूचा सापळा बनला आहे संबंधित विभागाचे या रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे सदर रस्ता गुणवत्ता पूर्ण व्हावा यासाठी बुधवारी अकरा वाजेपासून ते एक वाजेपर्यंत सोयगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व पक्षीय रस्ता रोको करून निदर्शने करण्यात आली होती.दरम्यान भाजपचे सुनील गवांडे यांच्या नेतृत्वाखाली हा रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून ते फर्दापूर रस्त्यावर वाहनांची रांगा च रांगा लागल्या होत्या यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता अजय टाकसाळ यांनी सदर काम हे गुणवत्ता पुर्वक करण्यात येईल,तसेच अंदाजपत्रक नुसार काम करून (दि.३१) मार्च पूर्वी हे काम पूर्ण करून काम पूर्ण न झाल्यास संबंधित ठेकेदाराला दंड देण्यात येऊन रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी साईड पट्ट्या मुरुमाने भरण्याची आश्वासन दिले.यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) रंगनाथ काळे,मंगेश सोहनी,सुनिल गवांडे,मयूर मनगटे,तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेंद्र काळे,रवींद्र काळे राष्ट्रवादी कॉंग्रेस शहर अध्यक्ष,गजानन चौधरी,दिलीप चौधरी,शिवसेना तालुकाप्रमुख(ठाकरे गट) दिलीप मचे राजेंद्र जावळे,संजय मोरे,शोभराज चौधरी,संजय तायडे,गजानन चौधरी,नामा जाधव,वसंत बनकर,प्रमोद पाटील,भागवत बारी,रघु बारी समाधान आहे अजय नेरपगारे आदी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

### महात्मा गांधी



१९३४ सालच्या डिसेंबर मध्ये वर्धा येथे संघाचे शिबिर होते. एकूण पंधराशे स्वयंसेवक होते. या शिबिराजवळच्या जागेवर महात्मा गांधीजींचा सत्याग्रहाश्रम होता. म. गांधींनी स्वतःहून शिबिराला भेट दिली होती. आणि अहो आश्चर्यम्- संघाचा तो सैनिकी पद्धतीचा तळ, स्वयंसेवकांच्या राहण्याच्या छपऱ्या, गणवेशधारी स्वयंसेवक, त्यांची वृत्ती, स्वयंपाकघर व तिथली स्वच्छता, घराघरातून आलेल्या पोळ्यांचा ढीग, सर्व जातींचे एकत्रित जेवण व संघाचा बँड पाहून महात्मा गांधी अवाक् झाले व नकळत पण उत्स्फूर्तपणे म्हणाले उभ्या देशातून असे प्रभावी दृश्य मी याआधी पाहिले नाही. त्यांनी मुद्दामून प्रवेश रजिस्टर पाहिले. त्यात जातीचा उल्लेख देखील नव्हता. याची आठवण त्यांनी १६ सप्टेंबर १९४७ च्या शिबिरात आवर्जून केली होती हे विशेष. (क्रमशः)

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# भामाठाण येथे धर्मनाथ बीज निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमचे आयोजन : स्वामी अरुण नाथ गिरीजी महाराज



तभा वृतसेवा दि २२

खुलताबाद तालुका प्रतिनिधी : भामाठाण येथील अडबंगनाथ संस्थान येथे, धर्मनाथ बीज गुरुवर्य नारायणगिरीजी बाबा यांच्या कृपा आशीर्वादाने २२ वर्ष ची परंपरा असलेल्या अडबंगनाथ संस्थान भामाठाण तालुका श्रीरामपूर या ठिकाणी दि २४/१/२५ ते १/२/२५ या नवनाथ पारायण. किर्तन महोत्सव. प्रवचन. या कालावधीत विविध महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार चे दैनंदिन कार्यक्रम आयोजन करण्यात आले , महाराष्ट्र भरातून येणार , भाविकांसाठी चहा नाष्टा जेवणाची व्यवस्था विविध अन्नदात्यांच्या वतीने संस्थांनी केलेली असून या कार्यक्रमाचा भाविकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन अडबंगनाथ संस्थान भामाठाण प्रमुख स्वामी अरुण नाथ गिरीजी महाराज यांनी संस्थांच्या वतीने केले.

# निरोगी आयुष्यासाठी स्वच्छता महत्त्वाची : रंगनाथ काळे

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराची सांगता



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ जानेवारी

मानवी आरोग्य निरोगी राहण्यासाठी ग्राम स्वच्छता महत्त्वाची आहे.गावामध्ये स्वच्छता नसेल तर त्याचा परिणाम माणसाच्या आरोग्यावर होतो.मानवी आरोग्य सुधारावे यासाठी स्वच्छता हा मूळ घटक मानून तत्कालीन महाराष्ट्र राज्याचे ग्राम स्वच्छता मंत्री आर.आर. पाटील यांनी राज्यात ग्राम स्वच्छता अभियान राबवून ग्राम स्वच्छतेचा वेगळा मंत्र दिला.असे मत जिल्हा परिषद माजी अध्यक्ष रंगनाथ काळे यांनी व्यक्त केले. ते संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर जिल्हा परिषद माजी अध्यक्ष हरिश्चंद्र लगाने,राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) जळगाव जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष रिजवान खाटीक,प्राचार्य डॉ. शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,माळेगावच्या सरपंच साधनाताई राजपूत,जि.प.शाळेचे मुख्याध्यापक बारी सर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रदीप गोल्हारे यांनी तर प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.निलेश गावडे यांनी केले.राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील विविध कामाबाबत स्वयंमसेवक दिप्ती सोनवणे,वैष्णवी एलिस यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनी भूमिका मांडल्या.

या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक रवींद्र राजपूत, शिवराम जाधव,डॉ.निलेश गावडे,डॉ.पंकज गावित, डॉ.प्रदीप गोल्हारे यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या कर्यक्रमासाठी गावकरी,प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार्यकारी अभियंतांनी अंबाडी प्रकल्पाची केली पाहणी; सिंचन आढावा बैठकीत घेतला कामांचा आढावा



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२२ जानेवारी - तालुक्यातील सिंचन कामाचा आढावा कार्यकारी अभियंता एस.जी.शहापुरे यांनी दि.२२ रोजी घेतला.

कार्यकारी अभियंता शहापुरे सिंचन आढावा बैठकीसाठी शहरात आल्या होत्या यावेळी त्यांनी अंबाडी मध्यम प्रकल्पाला भेट देत पाहनी केली,दुपारी सिंचन आढावा बैठक घेत सिंचन विषयीच्या अडचणी जाणून घेतल्या यावेळी उपविभागीय अभियंता एस.टी. कुमावत, शाखा अभियंता जी.बी.ताजी, कालवा निरीक्षक जी.ए. वाघ, जी.जे. देवरे, व्ही.सी.राठोड, डब्लू. पी.राठोड, ई. डी. भोकरे सह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# लोकसभा विधानसभा निवडणूक २०२४ उत्कृष्ट कामगिरी; विभागीय आयुक्त दिलीप गावडे,जिल्हाधिकारी दिलीप स्वामी उपविभागीय अधिकारी लतिफ पठाण यांना पुरस्कार जाहिर

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(जिमाका) - नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या अधिकाऱ्यांना मुख्य निवडणूक अधिकारी यांनी पुरस्कार जाहिर केले असून त्यात विभागीय आयुक्त दिलीप गावडे व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना टपाली मतपत्रिकांचे देवाण घेवाण चे उत्कृष्ट नियोजनाचा पुरस्कार देण्यात आला असून सिल्लोडचे उपविभागीय अधिकारी लतिफ पठाण यांना उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी (१०४- सिल्लोड विधानसभा) म्हणून पुरस्कार जाहिर झाला आहे.

यासंदर्भात आज मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडून पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. त्यात उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी लोकसभा, उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी विधानसभा, टपाली मतपत्रिका देवाण घेवाणचे उत्कृष्ट नियोजन, मतदान साहित्य प्राप्त करण्याचे नियोजन, उत्कृष्ट मतदार सुविधा , उत्कृष्ट वार्तांकन आणि उत्कृष्ट शासकीय भागीदारी अशा गटात पुरस्कार जाहीर झाले. त्यात लोकसभा निवडणूकीसाठी उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून छत्रपती संभाजीनगर विभागात लातूर जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर, विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी १०४ सिल्लोड लतिफ पठाण, तर टपाली मतपत्रिकांची देवाण घेवाण करण्याचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना पुरस्कार जाहिर झाला आहे. तर उत्कृष्ट वार्तांकनाचा पुरस्कार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे तत्कालिन संचालक राहुल तिडके व दयानंद कांबळे यांना जाहिर झाला आहे.

# नगरपरिषदेच्या प्रशासकपदी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांची नियुक्ती!

## मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे रजेवर!



**मुख्याधिकाऱ्यांच्या बदलीच्या चर्चांना शहरात उधान!**

उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी प्रशासक पदाचा कार्यभार स्वीकारताच शहरात मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे यांच्या बदलीच्या चर्चे ला उधाण आले होते,परंतु मुख्याधिकारी रजेवर गेले असल्याने कोणालाच काही एक सांगता येत नव्हते!

तभा वृत्तसेवा

कन्नड : कन्नड नगरपरिषदेच्या प्रशासक पदाचा अतिरिक्त कार्यभार उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी दि.२२ रोजी स्वीकारला आहे. कन्नड नगरपरिषदेची निवडणूक लांबणीवर पडल्याने प्रशासकपदाचा कार्यभार मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे यांच्याकडे तीन वर्षे प्रशासक पदाचा कार्यभार होता.

दि २२ रोजी प्रशासकीय कारणास्तव नगर विकास विभागाच्या उपसचिव प्रियंका कुलकर्णी, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या आदेशानुसार उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या कडे कन्नड नगरपरिषदेचा प्रशासक पदाचा कार्यभार आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे, तर खाजगी कारणास्तव मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे रजेवर गेले असल्याने ते उपस्थित नव्हते,प्रशासक पदाचा कार्यभार स्वीकारताच उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी नगरपरिषदेच्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांची बैठक घेऊन पालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा विभागवार परिचय करून घेत प्रत्येक कर्मचाऱ्यांनी नेमून दिलेले काम इमाने इतबारे पूर्ण करावे, कामात कुचराई करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा देत प्रत्येकाच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी तहसीलदार विद्याचरण कडवकर,निवडणूक विभाग नायब तहसिलदार श्रावण उगले, तलाठी दिपक एरंडे,कार्यालयीन अधिक्षक प्रशांत देशपांडे,भाग्यश्री बेडगे, शितल चौधरी,वैशाली दाभाडे,पवन परदेशी,गणेश अंदूरे,प्राजक्ता शेजुळ,प्रतीक्षा दिवाणे,प्रांजल अल्लाड,सह कर्मचारी उपस्थित होते.

# माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांची जखमींना मदत

सिल्लोड (प्रतिनिधी) दि.२२ : सिल्लोड तालुक्यातील निल्लोड फाटा येथे दुचाकीवरून सिल्लोड कडे येत असलेल्या जावेद भिकन बागवान वय ५२ वर्ष,अमर जावेद बागवान वय २८ वर्ष व शाबानाबी जावेद बागवान वय ४८ यांना छत्रपती संभाजीनगर येथून जलगावकडे जाणाऱ्या चारचाकी कारणे मागून धडक दिल्याने यातील शाबानाबी जावेद बागवान यांचा मृत्यू झाला तर त्यांचे पती जावेद बागवान व मुलगा अमर बागवान हे गंभीर जखमी झाले. छत्रपती संभाजीनगर येथून सिल्लोड कडे येत असलेले माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी अपघात बघताच अपघातग्रस्त जखमींना



मदत करून तात्काळ सिल्लोड येथील जाधव हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले तसेच अपघातात मृत्युमुखी पडलेल्या महिलेला सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.यावेळी अक्षय मगर,राजू गौर,अकिल देशमुख उपस्थित होते.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण

छत्रपती संभाजीनगर दि २२ : देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिन समारंभनिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा २६ जानेवारी रोजी सकाळी ९:१५ वाजता पोलीस आयुक्तालयाच्या देवगिरी मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. मुख्य ध्वजारोहण जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट यांच्या हस्ते होणार असल्याचे विभागीय आयुक्त कार्यालयाकडून परिपत्रकान्वये सामान्य प्रशासन विभागाचे अपर आयुक्त अरविंद लोखंडे यांनी कळविले आहे.

या मुख्य शासकीय समारंभात जास्तीत जास्त व्यक्तींना सहभागी होता यावे म्हणून सकाळी ८.३० ते १०.०० वाजताच्या दरम्यान ध्वजारोहरणाचा इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येवू नये. शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच संस्था यांनी आपले ध्वजारोहणाचे कार्यक्रम त्या दिवशी सकाळी ८.३० वाजण्याच्या पुर्वी किंवा १०.०० वाजता नंतर करावेत.

मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभास सर्व प्रादेशिक अधिकारी, विभाग प्रमुख, जिल्हास्तरीय अधिकारी, सर्व शासकीय अधिकारी तसेच कर्मचारी यांनी राष्ट्रीय पोषाखात उपस्थित रहावे असे आवाहन श्री. लोखंडे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या वतीने देशव्यापी महारक्तदान शिबिराचे आयोजन



छत्रपती सभाजीनगर : ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स (AIOCD) आणि महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या वतीने मा. श्री. जगन्नाथजी उर्फ आप्पासाहेब सखाराम शिंदे यांच्या ७५व्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून २४ जानेवारी २०२५ रोजी भव्य देशव्यापी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर महारक्तदान शिबिर देशभरातील केमिस्ट्सच्या नेतृत्वाखाली विविध ठिकाणी आयोजित केले जाईल. यामध्ये एकाच दिवशी ७५,००० रक्तदात्यांकडून रक्तसंकलनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एक देश, एक व्यक्ती, एक दृष्टिकोन एक रक्तदान या घोषवाक्याखाली हे शिबिर राबवले जात असून, रुग्णांना जीवनदान देण्याचा हा सामाजिक उपक्रम अत्यंत प्रेरणादायक ठरेल.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आयोजन

औरंगाबाद जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष नितीन देशमुख आणि सचिव विनोद लोहाडे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात विविध ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. समाजसेवेच्या या पवित्र कार्यात जिल्ह्यातील फार्मासिस्ट मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवत आहेत. अध्यक्ष नितीन देशमुख सचिव विनोद लोहाडे नंदलाल काळे क्रोषाध्यक्ष निखिल सारडा सचिन मुगदिया वसंत भराड रहीसभाई हरीश काबरा सुनील देशमुख संजय लोढा कपिल टिबडीवाला इजाज भाई दीपक भारतीया आदींची पत्रकार परिषदेत उपस्थिती होती

रक्तदान शिबिर हे औषधी भवन गुलमंडी टीव्ही सेंटर मराठा क्रांती बहुउदेशीय संस्था, जळगाव रोड शहा बाजार कुरेशी फंक्शन हॉल कुरेशी हॉस्पिटल समोर लायन्स बाल सदन चिकलठाणा सिविल हॉस्पिटल मिनी घाटी गारखेडा श्री दंत मेडिकल जिजाई हॉस्पिटल खडकेश्वर महादेव मंदिर ग्रामीण हॉस्पिटल सिल्लोड बी झेड पी कॉम्प्लेक्स रेमंड शोरूम रोड कन्नड वसंत क्लब डेपो रोड राजेश मेडिकल वैजापूर पुष्पाजली हॉस्पिटल डॉ नंदकिशोर उदावंत गव्हर्मेंट हॉस्पिटल दायगाव रोड लासुर स्टेशन शिवाजी पुतळाजवळ अवनी मेडिकल पैठण ऋतुजा मेडिकल जवळ सोयगाव घृष्णेश्वर हॉस्पिटल महाराणा प्रताप चौक बजाज नगर ग्रामीण हॉस्पिटल महावीर मेडिकल समोर पाचोड कोकण वेस हनुमान मंदिर समोर बिडकीन येथे महा रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आला आहे.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत राज्यात ओलांडला लाखाचा टप्पा

छत्रपती संभाजीनगर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने बुधवारी एक लाख घरांचा टप्पा ओलांडला, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वसामान्य ग्राहकांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. या योजनेत घराच्या छतावर सौर ऊर्जानिर्मिती पॅनेल्स बसवून वीज निर्माण केली जाते. घरगुती वापरापेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीजबिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज महावितरणच्या जाळ्यात पाठवून उत्पन्नही मिळते. छतावर सौर ऊर्जा पॅनेल्स बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून तीन किलोवॅटला ७८ हजार रुपयांपर्यंत थेट अनुदान मिळते.

घरगुती ग्राहकांच्या मदतीसाठी पंतप्रधान मोदी यांनी गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात ही योजना सुरू केली होती. राज्यात २१ जानेवारीअखेर या योजनेत एकूण १,००,७०० घरांवर सौर ऊर्जा प्रकल्प बसविले गेले. त्यामध्ये ३९२ मेगावॅटची क्षमता निर्माण झाली व ग्राहकांना ७८३ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले.

# बिडकीन मधून जड वाहतुकीला बंदी असूनही सूरु

## जिव्हीपीआर कंपनीचे असुरक्षित नियमबाह्य काम सूरु



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २२ जानेवारी : छत्रपती संभाजीनगरला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीचे काम एमजीपी कडून जीव्हीपीआर इंजिनिअर्स लिमिटेड ठेकेदार कंपनीला देण्यात आलेले आहे. या ठेकेदार कंपनीचे खोदकाम करण्यासाठीं असुरक्षितता दिसून येत आहे.

अनेक ठिकाणी दिशा दर्शक फलक नसून खोदलेल्या जलवाहिनीसाठी अनेक जन खड्ड्यात पडून अपघात झालेले आहे. हे अपघात टाळण्यासाठी व जलवाहिनी टाकण्यासाठी अडथळा होऊ नये म्हणून विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगर पालिका आयुक्त ग्रामीण पोलिस अधीक्षक,महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी, एनएचएआय रस्त्याचे अधिकारी यांची बैठक होऊन जडवाहतूक बिडकीन व गेवराईमधून वळविण्यात आली आहे. चिकलठाणा व बिडकीन ग्रामीण पोलिसांनी स्थानिक वाहनधारक यांना गेवराई बिडकीन मधून प्रवेश साठी मोजकेच सवलत पास देण्यात आले होते.

मात्र त्या पासची वाहनधारकांनी फक्त आठवडाभर अंमलबजावणी केली व ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या पासला केराची टोपली दाखवली.२६ जानेवारी पर्यंत ग्रामीण पोलिसांनी लहान चारचाकी कार तीन चाकी, दुचाकी व रुग्णवाहिका या वाहनासाठी परवानगी दिली होती व जड वाहतुकीला पूर्णपणे बिडकीन मधून जाण्यासाठी बंदी केली होती तरी सुद्धा दररोज जड वाहतूक करणारी वाहने दिवस रात्र चालू आहे. बिडकीन व गेवराई मधून सर्रासपणे जड वाहतूक सुरू असून दररोज छोटे-मोठे अपघातातून अनेकांना आपले प्राण गमवावे लागत आहे.मागील एका वर्षात अनेकांचा जीव अपघात होऊन पैठण बिडकीन रोडवर गेल्याने व काहींना कायमचे अपंगत्व झाल्याने अनेकांचे संसार मोडल्याने मागील तीन दिवसांमध्ये अपघात होऊन दोन जणांना आपल्या जीव गमवावा लागला याकडे प्रशासन लक्ष कधी देणार ? अनेक जीवांची किंमत जलवाहिनीच्या कामासाठी मोजावी लागत आहे.

# बिडकीन येथे शेती फेरफार नोंद विषयी अदालत संपन्न



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २२ जानेवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील महसूल मंडळाधिकारी कार्यालयात पैठण तहसीलदार सारंग चव्हाण यांनी शेती विषय नोंद फेरफार बाबत आदालत घेतली होती यावेळी सरपंच अशोक धर्मे, मंडळ अधिकारी रवींद्र जोशी, तलाठी सचिन काशीकर, तलाठी निलेश आहेर, रवींद्र मुखेडे, ज्ञानेश्वर सोळुंके, कल्पना पोकळे, प्रदीप वर्मा, विजय फसाटे, बबन ठाणगे, अमोल कोथिंबीरे, व पत्रकार, किशोर भाऊ शिंदे भाऊ शिंदे आदींसह बिडकीन मंडळातील तलाठी उपस्थित होते, शेती फेरफार आदालत मध्ये १२ फेरफार निर्गमित करण्यात आले,तर तीन फेरफार तक्रारी निकाली काढण्यात आल्या, नागरिकांना सातबारा वाटप करत तसेच पीक पाहणी ऑनलाइन बद्दल तहसीलदार सारंग चव्हाण यांनी बिडकीन ग्रामीण रुग्णालय भेट देऊन अडचणी समजून घेतल्या.

## अग्रलेख...

# ट्रम्प २.० च्या निमित्ताने....

२० जानेवारी २०२५ रोजी ७८ वर्षांचे डोनाल्ड जॉन ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतली. ते अमेरिकेचे ४५ वे राष्ट्राध्यक्ष होते आणि आता ते ४७ वे राष्ट्राध्यक्ष बनले आहेत. अमेरिकेच्या आणि एकूणच जगाच्या राजकारणात ट्रम्प यांचे व्यक्तिमत्त्व फटकळ आणि काही बेभरवशाचे म्हणून प्रसिद्ध आहे. 'अमेरिका फर्स्ट' हे त्यांचे धोरण आणि ब्रीदही आहे. तरीही त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारताला अनेक प्रकारच्या अपेक्षा आहेत. २०१७ ते २०२१ पर्यंतच्या ट्रम्प यांच्या कारकीर्दीदरम्यान त्यांनी भारताला अनेक प्रकारचे सहकार्य केले. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींशी त्यांची जवळची मैत्री आणि भारतीय-अमेरिकन समुदायाबद्दलची त्यांची भावना या दोन गोष्टी ट्रम्प यांच्या दुसऱ्या कारकीर्दीबद्दल भारताला आश्वस्त करणाऱ्या वाटतात. जागतिक राजकारण व अर्थकारणात अमेरिका हा सर्वांत महत्त्वाचा देश. त्यांना त्यांचा देश सर्वांहून महत्त्वाचा वाटतो, यात गैर नाही. त्यामुळे भारताने एकीकडे अपेक्षा ठेवतानाच आपल्या देशाच्या हिताला प्राधान्य देऊनच ट्रम्प यांच्या दुसऱ्या कारकीर्दीच्या संदर्भात पावले उचलली पाहिजेत. इमिग्रन्ट्स अर्थात स्थलांतरितांच्या संदर्भात कठोर भूमिका घेतलेली असतानाच भारतीय-अमेरिकन समुदायाचे योगदान ट्रम्प यांनी मान्य केले होते. २०१९ च्या 'हाऊडी मोदी!' या ह्यूस्टनमधील कार्यक्रमात ट्रम्प यांनी तंत्रज्ञान, औषध आणि व्यवसाय यासारख्या क्षेत्रात अग्रणी असलेला समुदाय म्हणून भारतीय-अमेरिकन लोकांचे कौतुक केले आणि ते लोक अमेरिकेसाठी 'संपत्ती' आहेत, असेही म्हटले. याव्यतिरिक्त ट्रम्प प्रशासनाने अनेक भारतीय-अमेरिकन लोकांना प्रमुख पदांवर नियुक्त केले. ट्रम्प यांचा दुसरा कार्यकाळ सुरू होत असताना आपण आशावादी राहायला हरकत नसली, तरी भारत-अमेरिकेच्या संबंधांची पुनर्व्याख्या होईल, असे वाटते. इमिग्रेशन आणि व्यापार हे मुद्दे त्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. याशिवाय, दहशतवादाच्या विरोधातील लढाई आणि संरक्षण क्षेत्रातील सहकार्य यांतही काही ठोस पावले उचलली जाण्याची शक्यता आहे.

ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेताच अमेरिकेच्या धोरणातील बदलांचे सूतोवाच केले. त्याकडे भारताने डोळसपणे पाहिले पाहिजे. शपथविधीनंतरच्या अर्ध्या तासाच्या भाषणात त्यांनी अमेरिका फर्स्ट धोरणांतर्गत इतर देशांवर काही अंकुश आणण्याची घोषणा केली. आतापर्यंत आम्ही इतर देशांना श्रीमंत बनविण्यासाठी आपल्या देशातल्या लोकांवर कर लादत होतो. आता ही स्थिती बदलेल आणि आपल्या देशातील लोकांना श्रीमंत बनवण्यासाठी इतर देशांवर कर लादले जातील. निवडणूक जिंकल्यावर त्यांनी ब्रिक्स देशांवर (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) १०० टक्के टॅरिफ लादण्याची तसेच कॅनडा आणि मेक्सिकोचाही यात समावेश करण्यासंबंधी सूतोवाच केले होते, हे लक्षात घेतले तर त्यांच्या ताज्या घोषणेचा अर्थ कळतो. त्यांच्या या घोषणेचा संबंध अमेरिकेच्या व्यापारातील तोट्याशी आहे. त्यामुळे त्यांना काही ना काही प्रमाणात बोलल्याप्रमाणे वागावे लागेलच. हे सारे असले तरी भारताशी असलेले अमेरिकेचे संबंध ट्रम्प यांच्या कार्यकाळात अधिक बळकट होतील, अशी अपेक्षा करण्यास वाव असण्याची बरीच कारणे आहेत. त्यातले सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे भारत आणि अमेरिका हे जगातील सर्वांत मोठे व प्रभावी लोकतांत्रिक देश आहेत. दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे चीनच्या विस्तारवादी, विनाशवादी भूमिकेबद्दल दोन्ही देशांना वाटणारी चिंता आणि जागतिक समुदायाला या दोघांकडून असलेल्या अपेक्षा. तिसरा घटक म्हणजे अमेरिकेत राहणारे आणि राहायला-काम करायला जाणारे भारतीय. अमेरिकेत सुमारे ५० लाख भारतीय राहतात. अमेरिकेच्या लोकसंख्येच्या तुलनेत हा आकडा अंदाजे दीड टक्के. अमेरिकेत राहणारे भारतीय हे श्रीमंत लोक आहेत. अमेरिकेतील अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रमुख भारतीय लोक आहेत. छोटा-मोठा व्यवसाय करणारे भारतीय लोकही अमेरिकेत मोठ्या संख्येने आहेत. अमेरिकेतील मोठ्या कंपन्यांचे व्यवहार, वैद्यकीय सेवा, सॉफ्टवेअरमधील प्रगती या सर्वांसाठी त्या देशाला भारत व भारतीयांची गरज आहे. अमेरिकेची ही गरज भागवू शकेल, असा एकही मोठा समुदाय जगाच्या पाठीवर नाही. त्यामुळे ट्रम्प यांच्या दुसऱ्या कारकीर्दीत अमेरिका फर्स्ट कायम ठेवूनही भारताच्या व भारतीयांच्या संदर्भात ट्रम्प यांना, मनात आले तरी, फार टोकाचे काही करता येणार नाही असे दिसते. अमेरिका आणि चीन यांच्यातील स्पर्धा भारताच्या फायद्याची आहे. ऑस्ट्रेलिया, भारत, जपान आणि अमेरिका या चार देशांतील संरक्षणविषयक भागीदारी गटाला क्वाड या नावाने ओळखले जाते. 'क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटीज डायलॉग' हा त्या नावाचा विस्तार. क्वाड अलायन्सला अमेरिकेचे खंदे समर्थन आहे. इंडो-पॅसिफिक प्रदेश हा मुक्त व खुला असावा, यासाठी चीनवर अंकुश हवाच. चीनला रोखायचे असेल तर अमेरिकेला भारतासोबत राहावेच लागेल; संबंध कायम ठेवावेच लागतील, हे स्पष्ट आहे. जागतिक स्तरावर सुरू असलेल्या संघर्षांवर उपाय शोधण्यासाठी भारत मध्यस्थी करू शकतो, हे आता सिद्ध झालेले आहे. भारताची ही क्षमता ट्रम्प वापरतील, असे आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या तज्ज्ञांना वाटते. रशिया-युक्रेन युद्ध आणि मध्य-पूर्वेतील संघर्षावर भारतासारखा अलिप्त देशच मध्यस्थी करू शकतो. त्यातून भारताचा जागतिक प्रभाव वाढणार आहे. त्याचा फायदा भारताला होऊ शकतो.

ट्रम्प यांचा चीनवर असलेला राग सर्वांना माहिती आहे. त्यांनी अमेरिकेतील कंपन्यांना चीनवर अवलंबून न राहता इतर बाजारपेठांचा शोध घेण्याचा सल्ला यापूर्वीही दिला आहे. चीनला पर्याय म्हणून भारताचाच प्राधान्याने विचार होतो. अमेरिकन मालासाठी मोठी बाजारपेठ आणि अमेरिकन कंपन्यांसाठी कुशल मनुष्यबळ पुरवणारा देश म्हणजे भारत. ट्रम्प यांच्याच काळात अमेरिकेने भारताला क्रूड ऑईल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरू करण्यात आला. भारताचे मध्य-पूर्वेवरील अवलंबित्व त्यामुळे कमी झाले. त्यातून भारताला ऊर्जा सुरक्षिततेच्या दिशेने ठोस पावले टाकता आली. भारत-अमेरिका यांच्यातील संरक्षणविषयक सहकार्य तसे जुनेच आहे. ते ट्रम्प यांच्या कार्यकाळात आणखी विस्तारेल. ट्रम्प यांच्याच पुढाकाराने भारत व अमेरिका यांच्यात बेका (बेसिक एक्सचेंज अँड को-ऑपरेशन अग्रीमेंट) नावाचा करार झाला होता. त्या करारामुळे भारताच्या संरक्षणविषयक निर्णयांसाठी अमेरिकन उपग्रहांची विदा (डेटा) भारताला मिळण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यावर, विशेषत: दहशतवादाच्या विषयावर दबाव आणणे आवश्यक आहे. तो दबाव अमेरिका आणू शकतो. मात्र, त्यासाठी भारताची साथ हवी. अर्थात भारत आणि अमेरिका या दोघांचेही सहकार्य असेल तर पाकिस्तान आणि बांगलादेशवर नियंत्रण आणणे शक्य आहे. ट्रम्प यांनी पाकिस्तानला लष्करी सहाय्य देण्यास नकार दिला होता. पाकिस्तानच्या भूमीवरून अतिरेकी कारवाया चालतात आणि त्या रोखण्यासाठी पाकिस्तानचे सरकार काहीही करीत नाही, असा त्यांचा आक्षेप होता. पुलवामा, बालाकोट या घटनांच्या वेळी ट्रम्प यांनी भारताचे समर्थन केले होते. एकुणात ट्रम्प यांच्या दुसऱ्या कारकीर्दीकडून भारताने अपेक्षा ठेवावी, अशी बरीच मोठी पृष्ठभूमी तयार आहे. तरीही अमेरिका फर्स्ट ही ट्रम्प यांची भूमिका अमेरिकेतील भारतीयांना आणि आंतरराष्ट्रीय पटलावर भारताला अडचणीची ठरू शकते. त्यावर मात करणे आव्हानात्मक आहे. व्हिसावर आणलेले निर्बंध किंवा व्यापारविषयक अडचणी यांचीदेखील भारताला हाताळणी करावी लागणार आहे. संरक्षण, दहशतवादाचा विरोध, चीनचा विरोध, इंडो-पॅसिफिक प्रदेशातील सहयोग हे सारे मुद्दे दोन देशांना जवळ आणणारे. पण, अर्थकारणातील फायदा-तोट्याचे गणित प्रत्येकाला असतेच. चीन आणि पाकिस्तानला विरोध करायचा असेल तर भारताला जवळ घ्यावेच लागेल. एकूण जागतिक परिस्थितीचा विचार केला तर सदासर्वकाळ ट्रम्प महाशय भारताच्या बाजूनेच राहतील आणि भारताच्या हिताचेच निर्णय घेतील, अशा भ्रमात राहण्याचे कारण नाही. त्यांना त्यांच्या देशाचे भले पाहणे भाग आहे. ते आपण मान्य केले पाहिजे आणि त्याच वेळी आपल्या देशाचे भले पाहण्याचा आपला अधिकार राखून अमेरिकेशी संबंध ठेवले पाहिजेत.

## चिंतन

# हिंदू संस्कृतीत अर्थशास्त्राची बीजे

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

सध्या उत्तरप्रदेशातील प्रयागराज शहरात गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वतीच्या संगमावर जगातील सर्वात मोठे तात्पुरते शहर स्थापन झाले आहे. १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या कालावधीत या तात्पुरत्या शहरात जगातील सर्वात मोठा मेळा 'महाकुंभ' आयोजित असून ४२०० हेक्टर क्षेत्रात पसरलेल्या महाकुंभ मेळ्याच्या परिसरात केवळ भारतातीलच नाही तर जगभरातून भाविक आणि पर्यटक येऊ लागले आहेत. यावेळी महाकुंभ मेळ्यात ४०-४५ कोटी भाविक आणि पर्यटक येतील, असा दावा उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केला आहे. यामुळेच महाकुंभ मेळ्यावर लहान-मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे लक्ष आहे. महाकुंभ मेळ्याच्या तयारीसाठी केंद्र आणि उत्तरप्रदेश सरकारनेही मोठ्या प्रमाणात पैसे गुंतवले असून महाकुंभ मेळा केवळ उत्तरप्रदेशच नव्हे, तर देशाच्या अर्थव्यवस्थेला नवीन चालना देईल, असा अंदाज आहे. भारतातील जवळजवळ सर्व राज्यांमध्ये अनेक प्रमुख धार्मिक स्थळे आहेत, जी राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. आत्ताच अयोध्या आणि काशीमध्ये हे दिसून आले की, उत्तरप्रदेशच्या अर्थव्यवस्थेला येथून अचानक बूस्टर डोस कसा मिळाला आहे. गेल्या वर्षी जानेवारी ते सप्टेंबर या काळात १३.५६ कोटी लोकांनी अयोध्येत दर्शनासाठी भेट दिली होती, याच काळात १२.५१ कोटी लोकांनी ताजमहाल पाहण्यासाठी आग्र्याला भेट दिली होती. यावेळी नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी ८ लाख लोक काशी विश्वनाथ कॉरिडॉरवर दर्शनासाठी पोहोचले. गुजरात, ओडिशा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये मंदिरांमधून मिळणारे उत्पन्न राज्य सरकारला आधार देत आहे. राजस्थान, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि मध्यप्रदेश यासह इतर राज्यांमध्ये मोठे मेळे भरतात. प्रयागराजमधील महाकुंभ मेळ्यासाठी केंद्र व राज्य सरकारने सुमारे १५ हजार कोटी रुपयांचे बजेट वाटप केले आहे. ५६६ प्रकल्प राबविण्यात आले आहेत.

मेळा परिसर उभारण्यात २१ विभागांनी सहभाग घेतला आहे. यावेळी मेळा क्षेत्रही वाढविण्यात आले आहे. २०१९ च्या अर्धकुंभात मेळा क्षेत्र ३२०० हेक्टरमध्ये पसरलेले होते, जे यावेळी ४२०० हेक्टरमध्ये पसरलेले आहे, यावेळी लांबी ८ किलोमीटरवरून १२ किलोमीटरपर्यंत वाढली आहे. भाविक आणि पर्यटकांसाठी १८५० हेक्टरमध्ये पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. पुलांची संख्या २२ वरून ३० करण्यात आली आहे. दीड लाख तात्पुरती आणि दीड लाख कायमस्वरूपी शौचालये बांधण्यात आली आहेत. मेळा परिसरात १.७५ लाखांहून अधिक तंबू उभारण्यात आले असून २५ हजार लोकांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. मेळा परिसर ६७ हजार एलईडी दिवे, फ्लडलाईटनी प्रकाशमान करण्यात आला आहे. उत्तरप्रदेश सरकारने ७२६०.४५ कोटी रुपयांचे बजेट पारित केले आहे; ज्याद्वारे ४४१ प्रकल्प आणि १२५ विभागीय प्रकल्प पूर्ण झाले आहेत. यापैकी ७५ टक्के इमारतींमध्ये कायमस्वरूपी संरचना आहेत. यातील जास्तीत जास्त ४२ टक्के रक्कम पूल आणि रस्त्यांच्या विकासावर खर्च करण्यात आली आहे.

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दावा केला आहे की, महाकुंभ मेळ्यामुळे राज्यात २ लाख कोटी रुपयांची आर्थिक वाढ होईल. २०१९ च्या कुंभमेळ्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेत १.२ लाख कोटी रुपयांचे योगदान दिले. उत्तरप्रदेश सरकारला भाडे, सेवा शुल्क आणि करांच्या स्वरूपात महसूल मिळेल. परिसरातील टेंट सिटीमध्ये २००० रुपयांपासून ते ८० हजार रुपयांपर्यंतचे आलिशान तंबू उपलब्ध आहेत. महाकुंभ मेळ्याच्या तयारीतूनच ४५ हजारांहून अधिक कुटुंबांना रोजगार मिळाला आहे. मेळ्यातून देशभरातील लोकांना रोजगार आणि आर्थिक लाभ मिळत आहे. इतिहासावर नजर टाकली तर, १८८२ मध्ये ब्रिटिश राजवटीत प्रयागराजमध्ये कुंभमेळ्याच्या आयोजनावर सरकारी तिजोरीतून २०,२२८ रुपये खर्च झाले होते, तर सरकारला २९,६१२ रुपये नफा झाला होता आणि त्यातून ४९,८४० रुपये उत्पन्न मिळाले होते. केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार २०२१ मध्ये देशात ६७.७ कोटी लोक धार्मिक पर्यटनासाठी बाहेर पडले होते. २०२२ मध्ये ही संख्या १४३.९ कोटींवर पोहोचली. २०२२ मध्ये धार्मिक पर्यटनातून मिळालेले उत्पन्न ७.९ अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून १६.२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढले होते.

२०२३ मध्ये भारतातील धार्मिक पर्यटन बाजारपेठ ११७२.१ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची होती. २०२४ ते २०३२ दरम्यान १७.७५ टक्के चक्रवाढ वार्षिक वाढीच्या दराने ५१०२.३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. धार्मिक स्थळांकडे भाविक आणि पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अनेक छोट्या-मोठ्या गोष्टी सुरू केल्या जात आहेत. रिटेल स्टेट कन्सल्टंट सीबीआरआयने त्यांच्या अहवालात म्हटले आहे की, रिटेल ब्रँड्सनी तिरुपती, पुरी, अमृतसर, अजमेर यांसारख्या मध्यम आकाराच्या शहरांमध्ये त्यांची उत्पादने लाँच केली आहेत. अमृतसर, अजमेर, कटरा, सोमनाथ, वाराणसी, शिर्डी, पुरी, अयोध्या, मथुरा, तिरुपती, द्वारका, बोधगया, गुरुवायूर आणि मदुराई येथे आध्यात्मिक पर्यटनाच्या वाढीचा फायदा किरकोळ ब्रँड घेत आहेत. जगातील सर्व मोठे अन्न उद्योग भारतातील धार्मिक पर्यटन स्थळांकडे वळले आहेत.

२०१४ मध्ये देशात सत्ता हाती घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धार्मिक स्थळांच्या विकासावर विशेष भर दिला आहे. सरकार धार्मिक स्थळांच्या पुनरुज्जीवन आणि दळणवळणावर खूप वेगाने काम करत आहेत. स्वदेश दर्शन आणि प्रसादसारख्या विविध योजनांच्या माध्यमातून १२० प्रकल्प राबविण्यात आले आहेत; ज्यावर ६,८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला आहे. देशात १.५ लाख किलोमीटरचे रस्त्यांचे जाळे पसरले आहे. ५०० हून अधिक नवीन हवाई मार्ग आणि १५० हून अधिक नवीन विमानतळांमुळे हवाई संपर्क वाढला आहे. केंद्र आणि उत्तरप्रदेश सरकार भारतासह जगभरात महाकुंभाचा प्रचार करीत आहेत; जेणेकरून अधिकाधिक लोकांना प्रयागराजमध्ये आणता येईल. महाकुंभात प्रथमच उच्च तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. डिजिटल एक्सपिरीयन्स सेंटरपासून ते कुंभ सहायक चॅटबॉटपर्यंत, जे ११ भारतीय भाषांमध्ये संवाद साधण्यास सक्षम आहे, सुरू करण्यात आले आहे. चेहरा वाचणारे कृत्रिम बुद्धिमत्तेसह सुसज्ज कॅमेरे बसवण्यात आले आहेत. ड्रोन विरोधी यंत्रणा सक्रिय करण्यात आली आहे. शौचालय स्वच्छतेपासून ते पोलिस यंत्रणेपर्यंत सर्व गोष्टींसाठी ॲप्स बनवण्यात आले आहेत. जगात पहिल्यांदाच, गुगल मॅप्स एका तात्पुरत्या शहरात नेव्हिगेशन सुविधा प्रदान करीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाकुंभाला 'महापर्व' म्हटले. या काळात जगातील सर्वात मोठा मानवांचा मेळावा होत असून गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या पवित्र संगमावर कोट्यवधी लोक सहा मोठ्या स्नान पात्रांवर स्नान करतील आणि हे स्नान देशाच्या अर्थव्यवस्थेला एक नवीन मार्ग दाखवेल; जे देशाला आध्यात्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या आणखी पुढे घेऊन जाईल. महाकुंभ हा केवळ स्नान आणि पुण्य मिळविण्याचा उत्सव नसेल तर तो उत्तरप्रदेश आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला एक नवीन दिशा आणि गती देईल. प्रयागराज मेळा प्राधिकरणाला महाकुंभातून सुमारे २००० कोटी रुपये मिळतील. जाहिरातींमधून ३० कोटी रुपये आणि अंदाजे १०० दुकानांमधून विक्रीतून ६० कोटी रुपये उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे. याशिवाय, विविध हॉटेल, रेस्टॉरंट्स, व्यापार क्षेत्र आणि प्रदर्शनांमधील उत्पादनांच्या विक्रीतून २५० कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे.

९९८७७४६७७६

## वेध

**विजय निचकवडे**

# तो सैफ होता म्हणूनी...

गरिबाचं कितीही मोठं दुःख असलं ना, ते नगण्य असं छोटेसं असतं. पण तेच एखाद्या श्रीमंत व्यक्तीला साधं खरचटलं तरी अनेकांच्या काळजाचे ठोके चुकतात. राजकारण्यांना कंठ फुटतो आणि मीडिया तर किंकाळ्या मारत सुटते. कारण 'ती' व्यक्ती सेलिब्रेटी असते! एका सेलिब्रेटीवरील अशाच हायप्रोफाईल हल्ल्याच्या निमित्ताने चार दिवस जे वातावरण ढवळून निघाले, कदाचितच सामान्यांसाठी हे झाले नसते! म्हणूनच तर 'तो सैफ होता म्हणूनी' असं कुठेतरी वाटून जातं. खरं तर दुःख, वेदना आणि कुणावर आलेली संकटे ही गरीब-श्रीमंत अशी मापदंड लावून मोजणे म्हणजे माणुसकीला तिलांजली दिल्यासारखे होईल. मात्र आज वास्तव हेच आहे. जिथे सख्खे नाते पैशात मोजले जाते. पैशासाठी रक्ताच्या नात्याचा विसर आम्हाला पडतो, तिथे दुःख, वेदनाही अशाच गरीब-श्रीमंतीच्या तराजूत मोजल्या जाऊ लागल्या आणि लोकांचे व्यवहार त्याच दृष्टीने बदलू लागले. खरं तर दुःख हे गरीब श्रीमंत किंवा संबंधित व्यक्तीची पत-प्रतिष्ठा पाहून ठरविले जायला नको, पण आज तेच होत आहे. चार दिवसांपूर्वी सिने अभिनेता सैफ अली खान यांच्या घरी चोरीच्या मानसिकतेने शिरलेला चोर, खान यांच्यावर झालेला चाकूहल्ला आणि त्यानंतर ज्या पद्धतीने राजकीय नेते, माध्यमे विशेषत्वाने इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रशासन आभाळ कोसळल्यागत वागू लागले; यातून लोकांचे दुःख आता वाटल्या गेल्याचाच भास होतो. एरवी एखाद्याच्या घरी हीच घटना घडली असती तर खरंच मुंबईत बसून राजकीय नेत्यांनी अशा पद्धतीने झालेल्या घटनेला घेऊन गळे काढले असते का? माध्यमांनीही खरंच एका चोरीच्या घटनेला अशा पद्धतीने जिव्हाळ्याचा विषय बनवून लावून धरले असते का? आणि पोलिस यंत्रणा इतक्या सजगतेने कामाला लागून जीवाचे रान करून चोरट्याला पकडण्यासाठी धावली असती का? कदाचित सामान्य माणूस या सर्व प्रश्नांची उत्तरे नक्कीच नाही असे देईल. पण या ठिकाणी 'तो सैफ होता म्हणूनी' सर्वकाही झाले.



सैफ यांच्यावरील झालेला हल्ला नक्कीच समर्थनार्थ किंवा दुर्लक्षित करण्यासारखा नाही, पण तो सैफ होता म्हणून जे काही झाले, ते सामान्य नागरिकांना त्यांची लायकी दाखवून देणारे आहे. पोलिसांची ३५ पथके हल्लेखोराला शोधण्यासाठी तैनात होतात. २०० पोलिस गराडा घालून एका झिलपट हल्लेखोराला पकडतात. आमचे नेते गळे काढू लागतात. कायदा सुव्यवस्था ढासळल्याचे छाती पिटून शांततात. काही जण सैफचे समर्थन करण्याच्या नादात विषयाला धार्मिक रंग देण्याच्या नादात हा हल्ला तैमूरवर तर नव्हता, असे बोलून प्रकरणाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न करतात. तर दुसरीकडे माध्यमं जणू काही आभाळ कोसळल्यागत या विषयाचा किस काढू लागतात. मग सैफ ऑटोने दवाखान्यात गेल्यापासून बरेच काही त्यांना दाखववेसे वाटते. या सर्व गोष्टी कधी सामान्य लोकांच्या बाबतीत झाल्या आहेत का हो? १० वर्षांपूर्वी भंडाऱ्यात पटेल आणि शिंदे या दोन कुटुंबावर अशाच चोरीच्या हेतूने हल्ला झाला. पटेल कुटुंबाने आपली सून गमावली तर शिंदे कुटुंबातील लेकीचे आयुष्य कायमस्वरूपी अपंगत्वामुळे उद्ध्वस्त झाले. पण त्याचे दुःख ना राजकारण्यांना झाले, आज गळे काढणाऱ्या मीडियाला आणि पोलिस यंत्रणेलाही फारसे महत्त्व वाटले नाही? कदाचित ज्यांचे जीव गेले ते सेलिब्रेटी नव्हते म्हणून किंवा त्यांचे आडनाव 'खान' नसल्याने असावे! पालघरमध्ये दोन साधूंना ठेचून मारण्यात आले, तेव्हाही हे दुःख कुणाला मोठे वाटले नाही. गुन्हे अनेक घडतात. जे सैफ सोबत झाले, ते रोज कित्येकांसोबत होत असावे, पण त्याची तीव्रता कुणालाही जाणवत नसावी. आज ज्या पद्धतीने सैफचा विषय डोक्यावर घेतला गेला, नव्हे याला इव्हेंट बनवून मांडण्याचा प्रयत्न केला गेला, त्यात राजकारण्यांचे ढोंग, माध्यमांची अतिशयोक्ती आणि पोलिसांची सेलिब्रेटीप्रती असलेली सजगता दिसून आली. सगळ्यांची ही तळमळ खरंच सामान्यांच्या प्रती दिसली तर कदाचित सैफसारख्या व्यक्तींवर होणारे हल्ले चर्चेचा आणि उपहासाचा विषय होणार नाही. सैफचे घर राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यापासून चाकूचा तुकडा प्रदर्शनीत जतन करून ठेवण्याचा सल्ला देण्यापर्यंत जर लोकांच्या मनात सगळ्यांच्या वागण्याचे नकारात्मक भाव उमटत असतील तर 'तो सैफ होता म्हणुनीच' हा सर्व खटाटोप झाला, असेच म्हणावे लागेल.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# मुण्डकोपनिषदातील अंगीरस-शौनक संवाद

**प्रा. दिलीप जोशी**

दशोपनिषदातील अत्यंत महत्त्वाचा आणि आपला विज्ञानमय कोश पुष्ट करणारा उपनिषद म्हणजे 'मुण्डकोपनिषद' होय. हा उपनिषद अथर्ववेद अंतर्गत असल्यामुळे याला 'अथर्वेदीय उपनिषद' असेही म्हणतात. अथर्ववेदात प्रश्नोपनिषद, मुण्डकोपनिषद, माण्डुक्योपनिषद हे प्रमुख उपनिषद तर आहेतच; याशिवाय गर्भोपनिषद, ब्रह्मबिंदू, जलबिंदू, अमृतबिंदू, अथर्वशिखा, नारायण, तापिनी इत्यादी २४ गौण उपनिषदही आहेत. पण मुण्डकोपनिषद सर्व परिचित आणि संविधानात उल्लेखित उपनिषद आहे. मुण्डकोपनिषदाला 'मुण्डक' असे नामाभिधान का झाले ? या संबंधात विविध अभ्यासकांचे मत थोड्या फार भेदाने पाहावयास मिळते. 'मुण्ड' या शब्दावरूनच आपल्या लक्षात येईल की, मुण्ड म्हणजे आपले डोके. मुण्ड हे उत्तमांग आहे. त्यातही मुण्डाचा प्रमुख भाग आहे बुद्धी. बुद्धी तशी शांत राहू शकत नाही. म्हणजे बुद्धीला विषय हवाच हवा. जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांनी आपल्या प्रसिद्ध अभंगात स्पष्ट केले-

*भक्त ऐसे जाणा जे देही उदास । गेले आशापाश निवारोनी*
*विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे जन धन माता पिता ॥*

त्यांनी देही उदास असलेले, ज्यांना आशापाश जखडू शकत नाही, ज्यांना जन-धन, माता-पिता म्हणजे ऐहिक, संसारिक बाबी, नातेसंबंध, पैसा; इतकेच काय, माता-पित्यातही ज्यांचे मन आणि बुद्धी अडकत नाही, त्यांना 'भक्त' म्हटले आहे. पण बुद्धीला तर विषय लागतोच; बुद्धीचा विषय नारायणच असल्यावर बुद्धीचा विषयच संपतो. ज्यांच्या बुद्धीचा म्हणजे मुण्डक्याचा विषय भोग नसून बुद्धीचा विषयच नारायण झाला असे जे साधक आहेत त्यांचे वर्णन संत तुकाराम महाराजांनी केले. म्हणजे ज्यांच्या डोक्यात म्हणजे मुण्डक्यात फक्त नारायण आहे. अशाच निरपेक्ष साधकांनी हा उपनिषद अभ्यासावा लागतो म्हणून हा मुण्डकोनिषद आहे. दुसरा अर्थ पाहू- मुण्डण करणे म्हणजे संन्यास दीक्षा घेताना मुंडण करण्याचा संस्कार असतो. म्हणजे हा उपनिषद अभ्यासताना संन्यस्त वृत्तीने म्हणजे वैराग्य वृत्तीने श्रवण करावा. 'संन्यस्य श्रवणम् कुर्यात' हे आपले तत्त्वच सांगते. म्हणून या उपनिषदाला 'संन्यासोपनिषद' असेही म्हणतात. पूर्वी हे उपनिषद अभ्यासण्यापूर्वी मुण्डणाची पद्धत होती. आपल्या संस्कृतीत केस हे भोगाचे लक्षण आहे. केशवपन म्हणजे भोगवासनेतून निवृत्ती होय. वासना, कामना, आसक्ती, ममत्व यांचा त्याग म्हणजे मुण्डण होय. हा त्याग करणाराच मुण्डकोपनिषदांचा अधिकारी म्हणून हे नाव दिले आहे. उपनिषदात एक व्रत सांगितले आहे त्याला शिरोव्रत किंवा अग्निधारा व्रत म्हणतात. या व्रतात शिष्य गुरूंकडे जाताना संन्यस्थ होऊन डोक्यावर धगधगता अग्नी धारण करून जात असे. शिरोव्रताचे अनुष्ठान केल्याशिवाय ब्रह्मविद्या देऊ नये, हे मुण्डकोपनिषद सांगतो.

*तदेतत्सत्यमृषिरंगिराः पुरोवाच नैतद्‌चीर्णव्रतोधीते ॥*

यामध्ये अग्नीप्रमाणे धगधगती जिज्ञासा, ओढ, तीव्रता मुण्डावर धारण करून हा उपनिषद शिकावा. म्हणूनही याला मुण्डकोपनिषद म्हणतात. थोडक्यात हा उपनिषद संन्यस्त वृत्तीने अभ्यासावा. मुण्डकोपनिषदाचे एकूण ६५ मंत्र आहेत. ते तीन अध्यायात म्हणजे तीन मुण्डकात प्रश्नोत्तर स्वरूपात विभाजित केले आहेत. अध्याय म्हणजे मुण्डक होय. यात पूर्व पक्ष आणि उत्तर पक्ष आहेत, ज्याला शंका म्हणजे पूर्वपक्ष आणि निरसन म्हणजे उत्तर पक्ष होय. या उपनिषदात ब्रह्मविद्या म्हणजे जन्ममृत्यू, वार्धक्य, रोगव्याधी यांनी व्याप्त असलेला संसार आणि यासाठी कारण असणारी अविद्याकामकर्मग्रंथी या सर्वांचा निरस करून परब्रह्म स्वरूपापर्यंत नेते; ती ब्रह्मविद्या होय. या ब्रह्मविद्येचा संक्रमण प्रवाह या उपनिषदात आहे. सर्वप्रथम चतुर्भुज ब्रह्माने ही ब्रह्मविद्या आपला ज्येष्ठ पुत्र अथर्व ऋषींना सांगितली. अथर्व ऋषींनी ती अंगीरा ऋषींना सांगितली. त्यांनी ती सत्यवह ऋषींना सांगितली. त्यांनी ती अंगीरस ऋषींना सांगितली. या अंगीरस ऋषींच्या जवळ शौनक ऋषी गेले. शौनकांनी ब्रह्मविद्येसंदर्भात उपस्थित केलेल्या शंकांचे अंगीरस ऋषींनी केलेले निरसन म्हणजे 'मुण्डकोपनिषद' होय.

*ब्रह्म देवानां प्रथमः संबभूव विश्वस्यकर्ता भुवनस्य गोप्ता ।*
*स ब्रह्मविद्या सर्वविद्याप्रतिष्ठाम् अथर्वाय ज्येष्ठपुत्राय प्राह ॥१॥*
*अथर्वणे यां प्रवादेत ब्रह्माथर्वा तां पुरोवाचांगिरे ब्रह्मविद्याम् ।*

दुसऱ्या शब्दात या उपनिषदात अंगीरस-शौनक संवाद आहे. शौनकांनी सुरुवातीलाच प्रश्न केला की-

*कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति ॥३॥*

कोणती अशी वस्तू आहे की, ज्या एकाच वस्तूचे ज्ञान प्राप्त केल्यावर विश्वातील सर्व वस्तू जाणल्या जातील? त्याचे उत्तर अंगीरस ऋषींनी खूपच यथार्थ दिले.

*तस्मै स होवाच, द्वे विद्ये वेदितव्ये इति ह ।*
*स्म यद्ब्रह्मविदो वदंति परा चैव अपरा च ॥*

या विश्वात दोनच विद्या जाणण्यास योग्य आहेत त्या म्हणजे पराविद्या आणि अपरा विद्या. यावर झालेला संवाद म्हणजे मुण्डकोपनिषद होय. ज्ञान आणि सत्य याचे विवेचन यात आहे. परब्रह्म स्वरूप अस्ती आणि नास्ती स्वरूपात असल्याचे हा उपनिषद सांगतो. प्रणवध्यानाचे महत्त्व, आत्मज्ञान प्राप्ती, आत्मानुभूती अशा विविध बाबींवरची प्रश्नोत्तरी येथे आहे.

*तपसा चीयते ब्रह्म, ततोन्नमभिजायते ।*
*अन्नात्प्राणो मनः सत्यं लोकः कर्मसु चामृतम् ॥*

ब्रह्मापासून सर्वप्रथम अन्न, त्यापासून प्राण, त्यानंतर अनुक्रमे मन, सत्य, लोक, कर्म निर्माण झालीत. त्यानंतर त्या कर्माची अमृतस्वरूपाची अविनाशी फळे निर्माण झालीत. शरीररूपी वृक्षावर जीव आणि आत्मा असे दोन पक्षी राहतात. जीव आपल्या कर्मानुसार फळे चाखतो अथवा दुःखही भोगतो. आत्मा परमात्म्याशी तादातम पावण्याचे सामर्थ्य ठेवतो. नदी जशी सागराला मिळाली की आपले नामरूपरहित होते तसेच आत्म्याचे होय. अजून एक महत्त्वाचे- 'सत्यमेव जयते' हे भारताचे राष्ट्रीय वाक्य मुण्डकोपनिषदातीलच आहे.

*सत्यमेव जयति नानृतं, सत्येन पंथा विततो देवयानः ॥३।१॥६॥*

सत्याचाच विजय होतो, असत्याचा नाही. भारतीय राज्यघटनेत भारतरत्न डॉ. आंबेडकरांनी जी राजमुद्रा स्वीकारली त्या खाली 'सत्यमेव जयते' अंकित केले आहे. हे भारताचे राष्ट्रीय घोषवाक्य मुण्डकोपनिषदातून घेतले आहे. ज्ञान संप्रदाय एखाद्या मर्त्य व्यक्तीपासून उद्भवला नसून ते अपौरुषेय, अद्भुत, गुह्य, अलौकिक अशा परब्रह्म परमात्म्याचे ब्रह्मरसाचे संतर्पण आहे. गुरू-शिष्य परंपरा आणि त्या मंथनातून प्राप्त झालेले नवनीत म्हणजे मुण्डकोपनिषद होय.

९८२२२६२७३५

### मतदानासाठी आधुनिक तंत्रज्ञान

१९ जानेवारीच्या तरुण भारतातले डॉ. चंद्रकांत कुळकर्णी यांचे पत्र वाचले. मला सांगायला आनंद होतो की, भारतात काही संस्थेत अशी निवडणूक प्रक्रिया (ऑनलाईन बँकिंगसारखी) आहे. मतदारांना ई-मेलने लॉगीन आयडी, पासवर्ड, लिंक येतो. लॉग केल्यावर 'ओटीपी' व्यक्तिगत फोनवर टाकायचा व मग उघडलेल्या लिस्टवर टिक मारून मतदान करायचे, ही पद्धत 'इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनीअरिर्स' या संस्थेत कैक वर्षांपासून प्रचलित आहे. मी सभासद असल्यामुळे अशाप्रकारे आतापर्यंत दोनदा, राष्ट्रीय कार्यकारी मंडळ निवडणूक प्रक्रियेत मतदान केले. ही पद्धत सॉफ्टवेअर य ब्लॉकचेनद्वारे संचालित होत असल्याने गडबड व्हायची सूतराम शक्यता नाही. शिवाय मतदानाची संख्या प्रचंड मोठी असली, तरी यंत्रणा ती विनासायास हाताळू शकते. विशेष म्हणजे, याच पद्धतीने 'रिकॉल'चा अधिकारसुद्धा, मतदान केलेल्या मतदारांना ठरावीक काळानंतर देता येऊ शकतो. याबद्दल निवडणूक आयोग व शासन स्तरावर अधिक संशोधन/रिसर्च होणे गरजेचे आहे. या पद्धतीने सरकार व जनतेचा खर्चाचा बोजा फार मोठ्या प्रमाणात कमी होईल. जेणेकरून अशिक्षित मतदारांचीसुद्धा सोय होईल. 'एक देश, एक निवडणूक' ही संकल्पना अंमलात आणणे यामुळे सोपे होईल. सध्याच्या इंटरनेट युगात ही पद्धत अवलंबणे सर्वांनाच सोयीस्कर होईल.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

● ● ● ●

## वाचक पत्रे



### प्रयागराज महाकुंभ नियोजन उत्तम

प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभाचे नियोजन किती बारकाईने करावे लागले. अगदी कुटुंबात एखादे मंगलकार्य ठरले की गृहिणीला सगळे अंदाज घ्यावे लागतात. कार्यात किती लोक येतील हे लक्षात घ्यावे लागते. मग पुढचे नियोजन करावे लागते. त्यांची संपूर्ण व्यवस्था आल्यापासून परत जाईपर्यंत करावी लागते. अगदी तशीच व्यवस्था महाकुंभ मेळ्यात केली आहे. स्नानांची व्यवस्था करण्याकरिता घाट बांधणे. जेवणाची व्यवस्था, पार्किंगची व्यवस्था इत्यादी. या सगळ्याकरिता नियोजन आवश्यक आहे. जेवण म्हणजे त्याकरिता लागणारे साहित्य धान्य-पीठ व इतर सर्व पदार्थ. लोकं लाखोंनी येणार, विदेशातूनही येणारे आहेत. वेगवेगळी वाहने येणार त्याकरिता रस्ते चांगले हवेत. पार्किंगची व्यवस्था हवी. सोबतच राहायची व्यवस्था करायची. त्यातच खूप थंडी असणार. त्याप्रमाणे व्यवस्था केली आहे. तिथ वेगवेगळ्या आखाड्याचे साधुसंत त्यांच्या मानानुसार त्यांची व्यवस्था करायची, त्याचे नियोजन हवे. हे सर्व उत्तमरीतीने केले आहे. पूजा साहित्य विक्री करणाऱ्यांना जागा द्यायची; तेही मोठ्या प्रमाणात आहेत. पुन्हा इतके लोक येतच राहणार. साफसफाई करण्याची सोय हवी. हे किती मोठे नियोजन आहे. हे सर्व मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व त्यांच्या सरकारने उत्तम केले आहे. स्त्रियांना कुठलाही त्रास होणार नाही, ही काळजी घेतली आहे. लाखोंची व्यवस्था, त्यात शाही स्नानाला गर्दी होणारच आहे.

**अंजली पळणीटकर**/नागपूर

● ● ● ●

### हयातीत घरे मिळणार नसतील तर?

'गिरणी घरे' अंतर्गत प्रथम मोफत घरे, मग ८ लाख, मग १/३ हिस्सा यासम प्रस्ताव बदलत गेले; बरोबरीने प्रथम मिलच्या आवारातच, मग मुंबईत करता करता मुंबईलगत, परिसराबाहेर (निर्जन ठिकाणी) घरे देणार असे 'फक्त प्रसिद्धीपुरते' जाहीर करता करता आता खाजगी विकासकांपुढे पीपीपी आणि जेव्हीचे जाळे टाकत आणि दर्जेदार असा गोंडस शब्द गिरणी कामगारांच्या गृहनिर्माण प्रकल्पाला जोडत पुनश्च आभासी चित्र उभे करत गिरणी कामगारांच्या तोंडाला पाने पुसली जात आहेत. फक्त अपवाद म्हणून दीड लाख घरांच्या तुलनेत गेल्या काही वर्षांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या हजारभर (निकृष्ट बांधकामाच्या) घरांचे (मोबदला घेत) वाटप केले. आजपर्यंतच्या या कालहरणात गिरणी कामगार सत्तरीपार वृद्धत्वाकडे झुकलेले (काही निवर्तले), काही आपापल्या गावी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्थायिक झाले. शिवाय त्यांची वारस मुले आपापल्या व्यापात विखुरले गेल्याने बहुतेकांना घराची लॉटरी कोणत्या ठिकाणची व कधी लागेल याबाबत अशाश्नतता असल्याने त्यांना घर मिळण्यात स्वारस्य उरले नाही. यावर उपाय म्हणून पात्र गिरणी कामगार-वारसांपैकी ज्यांना आतापर्यंत कित्येक वर्षे मृगजळ वाटत आलेले घर घेण्यात स्वारस्य नसल्यास, त्यांच्या भरावयाच्या आर्थिक हिस्स्याची रक्कम वगळता उर्वरित रक्कम त्यांना अदा केल्यास 'ना रहेगा बाँस, ना बजेंगी बाँसुरी' प्रमाणे भविष्यात ना पोकळ आश्वासने, ना आशावाद झेलावा लागेल. महत्त्वाचे म्हणजे हा आर्थिक हिस्सा वृद्धत्वाकडे झुकलेले मूळ गिरणी कामगार लाभार्थी ठरून त्यांना त्यांच्या हयातीतच वाढत्या वैद्यकीय खर्चासाठी उपयुक्त ठरावा. ओघाने ते या मृगजळी घरजंजाळातून मुक्त होतील.

**किरण चौधरी**/९१५८८३९४१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## देशी दारूची अवैध विक्री; टाकळी येथे एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२२ जानेवारी -**

तालुक्यातील टाकळी येथे एका विरूद्ध विना परवाना अवैध देशी दारू विक्री व्यवसायात १९ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

देवणी पोलीसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी, तालुक्यातील टाकळी येथे विना परवाना छूप्या पध्दतीने घरात देशी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने विना परवाना बसवेश्वर चौका लगत स्वतःच्या कब्जात बाळगलेला माल देशी दारू संत्रा कागदी लेबलच्या १८० एम एलच्या १२ बाटल्या प्रति बॉटल किमत ७० रूपये प्रमाणे एकूण ८४० रूपयांचा मूद्देमाल जप्त करण्यात आला.



पोलीस राजेश गोरख लामतूरे यांच्या फिर्यादीवरून आरोपी मूरलीधर गुंडाप्पा आजणे रा. टाकळी ता. देवणी यांच्या विरोधात गूरनं १६/२०२५ कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्याणूसार गून्हा नोंद करण्यात आला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास हेडकॉन्स्टेबल राजेश लामतूरे हे करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत

**देवणी, दि.२२ जानेवारी -**

कै. रसिका महाविद्यालय, देवणी येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा सुरळीतपणे चालू आहेत. या अभ्यासकेंद्रावर बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी., एम. कॉम., एम.बी.ए. अशा विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीतपणे चालू आहेत. या परीक्षेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, वरिष्ठ पर्यवेक्षक प्रा.डॉ. प्रशांत भंडे, केंद्रसहाय्यक प्रा.डॉ. गोपाल सोमाणी, तांत्रिक सहाय्यक प्रा. अंकुश भुसावळे, संतोष मुळे, सुरज रंडाळे, दयानंद स्वामी यांच्यासह इतर कर्मचारी कार्यरत आहेत.



### शिवनेरीत स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**शिरूर अनंतपाळ, दि.२२ जानेवारी -**

येथील शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने दि.२२ जानेवारी रोजी स्वातंत्र्य सैनानी मराठवाडा मुक्ती संग्रामचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरूण धालगडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करून त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी.के. धुमाळे यांनी त्यांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी कार्यक्रम अधिकारी तथा विभागीय समन्वयक प्रा.डॉ. पांडूरंग मुठ्ठे, प्रा.डॉ. अमोल इंगळे सह महाविघालयातील प्राध्यापक, शिक्षकोत्तर कर्मचारी, रासेयोचे स्वंयसेवक, विद्यार्थी यावेळी उपस्थीत होते.



### अल्ताफ विभागीय स्पर्धेत प्रथम

**औसा, दि.२२ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई अंतर्गत झालेल्या पदविका महाविद्यालयाच्या अंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना झोन स्पर्धेत लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील पदविका द्वितीय वर्षातील विद्यार्थी अल्ताफ जावळकरने भालाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तर थाळीफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. या विजयाचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, क्रीडा शिक्षक पवार, एनएसएस प्रमुख मुंजाजी मुळे आदी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.



### ठाणे अंमलदार राजगिरवाड उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित

**अहमदपूर, दि.२२ जानेवारी -**

अहमदपूर पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत असलेले रामकिशन एस. राजगिरवाड यांनी अतिरिक्त सत्र न्यायालय अहमदपूर व हायकोर्ट छत्रपती संभाजी नगर येथील सर्व नोटीस, समंस, वॉरंट शंभर टक्के तामिल केल्याबद्दल पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी अहमदपूर पोलिस स्टेशन येथे सन्मानित केले. यावेळी पोलिस स्टेशनचे उपविभागीय पोलिस अधिकारी मनिष कल्याणकर, पोलिस निरीक्षक बी.डी. भुसनुर उपस्थित होते. या यशाबद्दल रमेश चव्हाण, बाबासाहेब वाघमारे, हरीराम गुट्टे, व्यंकट सांगुळे, भरत रोकडे, दराडे, मामडेवार, लक्ष्मण अलगुले या सर्व मॉर्निंग ग्रुपच्या सर्व सदस्यांनी त्यांच्या उत्कर्ष सेवेबद्दल अभिनंदन केले.

## औसा आगारातील कर्मचाऱ्यांच्या भुमिकेमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात

* चालक; प्रवाशातील हाणामारीची दोन गावाला शिक्षा...
* विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाणार?
* गेल्या सहा दिवसापासून कोरंगळा-समदर्गा गावची बससेवा बंद

**तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे**
**औसा, दि.२२ जानेवारी -**

किरकोळ कारणावरुन झालेल्या बाचाबाचीनंतर प्रवाशाने वाहकास केलेल्या मारहाणी प्रकरणी गुन्हा नोंद झाला. या घटनेचा औसा आगारातील कर्मचाऱ्यांनी आंदोलन करुन निषेध व्यक्त करीत दुसऱ्याच दिवसापासून बससेवा बंद केली. याचा फटका कोरंगळा व समदर्गा या दोन गावातील गावकऱ्यांना बसला आहे. तर या दोन गावातील सर्वच विद्यार्थ्यांचे शिक्षण गेल्या सहा दिवसापासून बंद झाले असून विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात सापडले आहे. प्रवाशी व वाहकाच्या भांडणात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार असल्याने याला जबाबदार कोण? याची चर्चा होत आहे.

शासन जनतेच्या सोयीसाठी अनेक योजना राबवित असून ग्रामीण भागात रस्ते, वीज व पाणी या मुलभुत गरजासह अनेक विकासकामे करीत आहे. महिलांना आरक्षण देऊन पुढच्या उज्वल भविष्यासाठी मुलींना मोफत शिक्षण देत आहे. तर मुलांना विशेष सवलती देऊन शिक्षणाची सुविधा करुन देत आहे. यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करण्यात करण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण भागातील मुली व मुलं घरची बेताची परस्थिती असतानाही शिक्षण घेत आहेत. मात्र गुरुवार दि.१६ रोजी औसा आगाराची औसा ते बिरवली बसमध्ये रात्री ८ वा. सुमारास प्रवाशी तरुणाची आणि वाहकांची बसमध्ये बाचाबाची झाली. कोरंगळा येथे बस आल्यानंतर सुरु होती. बस थांबल्यानंतर प्रवाशी व त्याच्या भावाने वाहकास मारहाण केली. याप्रकरणी भादा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रवाशाकडून वाहकास झालेल्या मारहाणीच्या घटनेचा औसा आगारातील कर्मचाऱ्यांनी आंदोलन करीत निषेध व्यक्त केला. व आरोपीना अटकेची मागणी केली. याचबरोबर दुसऱ्या दिवशीपासून कोरंगळा गावातील बससेवा बंद केली. याचा दीड किलोमीटर अंतरावरील समदर्गा गावाला फटका बसला आहे. कोरंगळा गावात १८०० मतदार असून जवळपास ३००० हजार लोकसंख्या आहे. तर समदर्गा गावाची जवळपास २५०० लोकसंख्या आहे. या गावातील शेकडो नागरिक कामानिमित्त या मार्गावरील बसमधून प्रवास करतात. तर या दोन गावची शेकडो मुली व मुले शाळेला जाण्यासाठी बसमधून प्रवास करतात.

गेल्या सहा सात दिवसापासून कोरंगळा गावात बस बंद झाली आहे. यामुळे गावातील विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद झाले आहे.

### भांडण एकाचे शिक्षा गावाला...

औसा-बिरवली बसने प्रवास करीत असताना प्रवाशी व वाहकांचे भांडण, मारहाण झाली. यामध्ये गावकऱ्यांचा काय दोष आहे. या भांडणाचा आणि विद्यार्थ्यांचा काय संबध आहे. बसपासून कांही अंतरावर वाहकाला मारहाण कशी झाली. बस चालकाने बस पोलिस ठाण्याऐवजी कोरंगळा गावात कशी थांबवली. बस बंद झाल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद झाले आहे. याला जबाबदार कोण? अशी अनेक प्रकारची चर्चा या परिसरातच नव्हे तर तालुक्यात होत आहे. या प्रकरणात आमचा काय दोष आहे. आम्हाला सजा का देता अशी विचारणा एकमेकांना होत असलेल्या चर्चेतून करीत आहेत.

### कर्मचाऱ्यांमध्ये दहशत...

या घटनेत कर्मचारी अद्याप आयसीयूमध्ये आहे. यामुळे इतर कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे.

या भागातून काम करण्यासाठी कोणताही कर्मचारी पुढे येण्यास तयार होत नाही. यामुळे आजतरी अडचण होत आहे.

उपचारातून सुधारणा झाली तर दबाव कमी होईल आणि बससेवा सुरु करता येईल, असे औसा आगार प्रमुख शंकर स्वामी यांनी सांगितले.

## रंगकर्मी प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ ट्रस्टच्या कार्याचा विशेष गौरव**

भव्य सोहळ्यात होणार सन्मान...

**तभा वृत्तसेवा / नागेंद्र साबणे**
**उदगीर, दि.२२ जानेवारी -**

उदगीर रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठानच्या वतीने प्रदान केले जाणारे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाली आहेत. मागील नऊ वर्षापासून सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक कला पर्यावरण आरोग्य कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य व भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. रंगकर्मी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड, सचिव ज्योती मद्देवाड यांनी पुरस्कार जाहीर केले. पुरस्काराचे वितरण शनिवार ८ फेब्रुवारी रोजी शिवाजी महाविद्यालय, उदगीर येथे सांय ४ वा मान्यवरांच्सा हस्ते समारंभात पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.



कलाक्षेत्रातील कार्याबद्दल फॉरेनची पाटलीन चित्रपटाचे दिग्दर्शक प्रदीप घोणसीकर मुंबई शामराव खंडेराव निघाले हैद्राबादला एकपात्रीकार, राजकुमार पाटील चिघळीकर उदगीर, गायक गीतकार किडीले सोमनाथ निवृत्ती, शि. अनंतपाळ, कला शिक्षक चंद्रदीप नादरगे उदगीर, मुंबई विद्यापीठाचे लोककला विभागाचे डॉ. शिवाजी वाघमारे मुंबई, मोहन तेलंगे अहमदपूर, चित्रकार सुनिता पाटील धुळे आरोग्य क्षेत्रातील कार्याबद्दल, रामराव एकंबेकर उदगीर, संजय सोनार जळगाव, शैक्षणिक क्षेत्र प्राचार्य एच.बी. विधाते आष्टी, प्रा. सिद्धेश्वर पटणे, विरभद्र घाळे, उदगीर भारती भगत पुणे, अरुणा कांदे लातूर, बळवंत राठोड हिंगोली, डॉ. श्रध्दा पाटील उदगीर, अनिता शानेवाड उदगीर, डॉ. शशिकांत पुरी बीड, विवेक कुलकर्णी जालना, किरण वाळके पुणे, मारोती गंगासागरे नांदेड सुनिता कदम नांदेड, डॉ. विठ्ठल गोरे उदगीर. साहित्य क्षेत्रातील पुरस्कार डॉ. सोमनाथ कदम कणकवली, प्रा. चंद्रशेखर कळसे जळकोट, शिवराज होके माजलगाव, रंजना सानप. सातारा पर्यावरण क्षेत्रातील पुरस्कार मंगल कचरू सांगळे, प्रियंका केदार सातारा, सामाजिकळ कार्यासाठी, सतिश पाटील माणकीकर यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

सर्व पुरस्कारार्थीचे रंगकर्मी प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## भारतीय स्वातंत्र्याची चिरफाड करणारी साहित्यकृती म्हणजे फ्रॅक्चर्ड फ्रीडम : डॉ. क्रांती मोरे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२२ जानेवारी -**

भारतीय शासन व्यवस्था आणि राजकारणाचा लेखाजोखा मांडताना सत्य आणि न्यायाप्रती असलेली बांधिलकी. स्वतःच्या विचारावरचा ठाम विश्वास यातून तुरुंगात देखील उपोषण आंदोलने करावी लागतात हे किती दुर्दैवाचे आहे. संबंध नसताना शिक्षा भोगणारे इतरांसाठी आयुष्य वाया घालवतात. भारतीय न्यायव्यवस्थेत न्याय हा कसा महाग आहे शिवाय तो मिळणे ही किती अवघड आहे. हे सांगत भारतीय स्वातंत्र्याची चिरफाड करणारी साहित्यकृती म्हणजे फ्रॅक्चर्ड फ्रीडम होय असे मत डॉ. क्रांती मोरे यांनी व्यक्त केले.

त्यांनी कोबाड गांधी लिखित व अनघा लेले अनुवादित फ्रॅक्चर्ड फ्रीडम या ग्रंथावर भाष्य करताना म्हणाल्या, उपेक्षितांसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना किती संघर्ष करावा लागतो, जन चळवळीतील कार्यकर्त्यांना पद्धतशीरपणे न्यायालयीन लढाईत गुंतवून तुरुंगात डांबून त्याचा आवाज कसा बंद करण्याचा प्रयत्न केला जातो हे सांगतानाच येणाऱ्या पिढीसाठी सुरक्षित व निकोप वातावरण द्यायचे असेल तर विचारावर बंधन, बोलके सुधारक व करते सुधारक मानवतावादी बनवण्याचा विचार रुजवला पाहिजे. यावेळी श्रोत्यातून अनेकांनी प्रस्तुत पुस्तकावर चर्चा केली.

## जिजाऊ सावित्री तुकोबाराय जन्मोत्सव निमित्ताने निलंगा येथे तीन दिवसीय भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२२ जानेवारी -**

मराठा सेवा संघ प्रणित जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही जिजाऊ सावित्री तुकोबाराय जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या जन्मोत्सव निमित्ताने दि.२८ ते ३० जानेवारी दरम्यान तीन दिवसीय भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठा सेवा संघाच्या वतीने गेली सतरा वर्षांपासून महापुरुषांच्या विचारांचा जागर निलंगा शहरात सातत्याने व्याख्यानमालेत केला जातो.

यावर्षी मराठा सेवा संघ प्रणित-जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेच्या वतीने विविध प्रबोधनकार किर्तनकारांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे.

यामध्ये मंगळवार दि.२८ जानेवारी रोजी हभप. शामसुंदर महाराज सोन्नर, संचालक संविधान समता दिंडी, बुधवार दि.२९ जानेवारी रोजी हभप. मधुकर महाराज कदम (बारूळकर), प्रसिद्ध कीर्तनकार तथा शिवव्याख्याते नांदेड. गुरुवार दि.३० जानेवारी रोजी हभप. ज्ञानेश्वर वाबळे महाराज, जेष्ठ समाज प्रबोधनकार, आळंदी यांचे भव्य कीर्तन संपन्न होणार आहे.

निलंगा येथील जिजाऊसृष्टी येथे सायंकाळी ७ ते १० या वेळेत तिन्ही दिवसांचा कीर्तन महोत्सव संपन्न होणार आहे.

## पावर आन व्हील या नाविन्यपूर्ण प्रयोगाची नांदी औशातून : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर

**औसा मतदार संघातील आढावा बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांची कबुली...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२२ जानेवारी -**

मुख्यमंत्र्यांनी शंभर दिवसाचा कार्यक्रम दिला असून याचा व्यवस्थित आराखडा तयार करून एप्रिल अखेरपुर्ण करावा. या कार्यक्रमाच्या माध्यमातून औशात केलेल्या कामाची पूर्तता दाखवून देण्याची संधी प्रशासनाला मिळाली असून प्रलंबित असलेल्या कामाच्या ठिकाणी विविध विभागाच्या चमूने पाहाणी करून सर्व विकासकामे वेळेत मार्गी लावावेत. शेत तिथे रस्ता अभियान अंतर्गत पावर आन व्हील या नाविण्यपुर्ण प्रयोगाची नांदी औशातून आहे. यामुळे आमदार निधीतून शेतरस्त्यांची प्रलंबित असलेली कामे शंभर दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत प्रभावीपणे राबवावीत व जनसामान्यांना शासनाच्या सेवा अधिक जलद गतीने उपलब्ध करून द्याव्यात. अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी दिल्या आहेत.

औसा विधानसभा मतदारसंघातील विकास कामे व प्रलंबित असलेल्या कामासंदर्भात जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी यांची मंगळवार दि.२१ रोजी औसा येथील प्रशासकीय सभागृहात आढावा बैठक झाली.

त्यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे बोलत होत्या. आ. अभिमन्यू पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नर्हे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, निलंगा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील चौधरी, नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे आदीसह विविध विभागाचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी वर्षा घुगे ठाकूर म्हणाल्या, प्रलिंबित कामासाठी ग्रामीण स्तरावर तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक तर तालुकास्तरावर तहसीलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांनी पुढाकार घेतला तरच सर्वाधिक प्रश्न सुटणार आहेत. स्मशानभूमीच्या संदर्भात २१ फेब्रुवारीपर्यंत मुदत दिली आहे. यासाठी तहसीलदार यांच्याकडे प्रस्ताव सादर करावेत. जिथे सरकारी जागा आहे. त्याची सनद तात्काळ द्यावी. ज्या ठिकाणी खाजगी जागा संपादित करायची आहे. याची व्यवस्था जलसुविधेतून मागणी करता येणार आहे. याचबरोबर ग्रामसंघासाठी २१ फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव सादर करावेत. मनरेगा, जिल्हा नियोजन समिती व आमदार निधीतून उत्कृष्ट ग्रामसंघाचे मॉडेल तयार करून त्या ठिकाणी बचत गटाच्या महिलांसाठी शॉपिंग सेंटर तयार करावेत. तसेच शासकीय कार्यालयातील मोकळ्या जागेत वृक्षलागवड करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी या बैठकीत केल्या आहेत.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, शासकीय जागा पडून राहूण्याऐवजी त्या व्यावसायिक दुष्टीने वापरात येणे आवश्यकआहे. ज्या शासकीय जागा पडून आहेत त्याठिकाणी व्यावसायिक आस्थापना उभा करण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे.

शासकीय कार्यालयाच्या ठिकाणी महिला बचत गटांना उपहारगृहासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी. जेणेकरून महिला बचत गटांना रोजगार निर्मितीसह उत्पन्नात वाढ होऊन महिला अधिक सक्षम होण्यास मदत मिळेल. भूकंपग्रस्त भागातील गावअंतर्गत रस्ते, नाल्याच्या विकास कामांसाठी विकास आरखडा तयार करून मुख्यमंत्री कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. या कामासाठी आपण पाठपुरावा करून एक विशेष पॅकेजची तरतूद करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणार आहे. मतदारसंघातील ज्या गावात स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नाही. तिथे शासकीय जमिनी उपलब्ध करून देण्यात याव्यात. आणि ज्या गावात शासकीय जागा उपलब्ध नाही त्या गावात खाजगी जागा उपलब्ध करून देवून येणाऱ्या वर्षभरात स्मशानभुमीच्या जागेचा विषय संपवून टाकावा. अशा सूचना आ. पवारांनी यावेळी दिल्या. प्रलंबित शेतरस्ता कामासाठी आवश्यकता आहे तेथे प्रशासनाने कार्यवाही करून शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करून द्यावेत, अशीही सूचना यावेळी आ. अभिमन्यू पवार यांनी दिल्या आहेत.

यावेळी मतदारसंघातील अनेक विषयाचा संबंधित विभागाकडून कामाचा आढावा घेण्यात आला.

## आदेशाला केराची टोपली; लोकशाही दिनाचा अधिकारी, कर्मचाऱ्यांची दांडी

**तभा वृत्तसेवा / शंकर मिटकर**
**शिरूर अनंतपाळ, दि.२२ जानेवारी -**

शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयात सोमवार दि.२० जानेवारी रोजी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते. पण याठिकाणी एक ही तक्रार आली नाही, परंतु सर्व विभागाचे प्रमुख या लोकशाही दिना निमित आयोजीत बैठकीला येणे अपेक्षीत होते. पण काही विभागाच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना तहसीलदारानी निमंत्रण देऊन ही त्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत लोकशाही दिनाला दांडी मारल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यातील विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी या लोकशाही दिनाकडे पाठ फिरविली आहे. या लोकशाही दिनाचे अनेक विभागाच्या प्रमुखांना गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे. या गैरहजर अधिकाऱ्यां विरुद्ध तहसीलदार काय कार्यवाही करणार असे जनतेतून बोलले जात आहे. सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी अडचणींना तत्परतेने न्याय मिळण्याची शासकीय यंत्रणा म्हणजे 'लोकशाही दिन' होय. कार्यपद्धती अगदी सुलभ व्हावी यासाठी तालुकास्तरावरही दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात यावे असे जिल्हाधिकारी यांनी आदेश दिले आहेत. त्यानुसार सोमवारी दि.२० जानेवारी रोजी येथील तहसील कार्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते.



या झालेल्या लोकशाही दिनाला तहसीलदार गोविंद पद्देवाड, नायब तहसीलदार लालासाहेब कांबळे तानाजी यादव, नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी दिपक भराट, गट शिक्षण अधिकारी अनिल पागे सहाय्यक विस्तार अधिकारी मंडावले, तालुका कृषी अधिकारी एल.एस. खताळ, गट विकास अधिकारी बी.टी. चव्हाण, व लिपा. उप विभाग शिरूर अनंतपाळचे मोरे जी.बी., निबंध कार्यालयाचे वंसत घुले, आरोग्य विभागाचे एक कर्मचारी उपस्थित होते.

मात्र तहसील कार्यालयाने तालुकास्तरावरील सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्यासंदर्भात संबंधित कार्यालयाकडे लेखी पत्र पाठवूनही ग्रामिण रुग्णालय, पशुवैद्यकीय विभाग, तालुका भुमिअभिलेख, पोलिस ठाणे, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे उपविभाग, भारतसंचार निगम उपविभाग, भुवैज्ञानिक कार्यालय, लागवड अधिकारी विभाग, वनपरीमंडळ विभाग, महिला व बालविकास प्रकल्प विभाग, संरक्षण अधिकारी व इतर कार्यालयाचे अधिकारी किंवा प्रतिनिधी यांनी या 'लोकशाही दिना'कडे पाठ फिरवून उपस्थित न राहणे पसंद केले. ही अनु उपस्थीती त्यांच्या बैठकीला उपस्थित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्याच्या नोंदीवरून दिसून येत आहे.

दरम्यान सोमवारी झालेल्या या लोकशाही दिनात एक ही तक्रार आली नसल्याचे दिसून येते.

### अनुपस्थित अधिकारी यांच्यावर काय कार्यवाइ होणार ?

शिरूर अनंतपाळ येथे झालेल्या लोकशाही दिनात केवळ आठ विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. मात्र इतर विभागाचे अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी अनुउपस्थिती दर्शविल्याने या अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार यासंदर्भात तहसीलदार गोविंद पद्देवाड यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता ते म्हणाले की त्याच्यावर कार्यवाही करण्यात येईल असे ते म्हणाले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतकरी आंदोलनाकडे दुर्लक्ष केल्यामुळे निषेध आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**
पंजाब येथील शेतकरी नेते जगजितसिंग डल्लेवाल हे मागील वर्षभरापासून शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करीत आहेत. परंतु केंद्र सरकार या आंदोलनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा निषेध हिंगोलीतील शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाच्यावतीने करण्यात आला. यावेळी लाक्षणिक उपोषण करीत प्रशासनाला निषेधाचे निवेदन सादर करीत तत्काळ जगजितसिंग डल्लेवाल यांच्या आंदोलनाची दखल घेण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटना हिंगोली यांच्या वतीने सकाळी अकरा वाजल्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केंद्र सरकारच्या निषेधार्थ लाक्षणिक उपोषण सुरू करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांच्या विविध मागण्या केंद्र शासनाने तत्काळ मान्य कराव्यात. केंद्र सरकार शेतकरी आंदोलनाची हेडसांड करत आहे. पंजाब येथील एक वर्षापासून सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाकडे केंद्र सरकार अक्षम्य दुर्लक्ष करत आहे. सरदार जगजीतसिंग डल्लेवाल हे मागील ५० दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत याकडे केंद्र सरकार जाणून दुर्लक्ष करत आहे. या शेतकऱ्याच्या उपोषणाच्या समर्थनार्थ हिंगोली येथील स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण सुरू करण्यात आले आहे. यावेळी केंद्र शासनाच्याविरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली.

यावेळी स्वतंत्र भारत पक्षाचे जिल्हाध्यक्ष उत्तमराव वाबळे, डॉ अशोक पातुरकर, अंजली पातुरकर, देवीप्रसाद ढोबळे, खंडबाराव पोले, खंडबाराव नाईक, प्रल्हाद राखुंडे, दादाराव शिन्दे, दासराव कातोरे, महादजी चव्हाण, भारत तांबीले, रामकृष्णा देशपांडे, रुद्राक्ष आप्पा, डॉ.निवृर्ती वाबळे, शेषराव राखुंडे, विठ्ठलराव भुमरे, पांडूरंग जाधव, शंकर कऱ्हाळे, रामदास गोरे, गजानन कऱ्हाळे, रमेश गरड, भाऊराव शिंदे, परबत माने, मुरलीधर कदम, दादाराव शिंदे, रावसाहेब कऱ्हाळे, गजानन कऱ्हाळे, रामेश्वर कऱ्हाळे, मुंजाराव बेंगाळ यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थित होते.

# ब्राम्हणवाडा महाशिबीरात २०० जणांची मोफत आरोग्य तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**
सेनगाव तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथे विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ पहेणीद्वारा आयोजित नाकाडे मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल हिंगोली व ग्रामपंचायत कार्यालय ब्राम्हणवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जानेवारी मंगळवार रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेदरम्यान मोफत महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या मोफत आरोग्य तपासणी शिबीरात २०० रुग्णांची मोफत तपासणी तज्ञ डॉक्टरा मार्फत करण्यात आली.

ब्राम्हणवाडा येथे मोफत आरोग्य महाशिबीराचे आयोजन २१ जानेवारी मंगळवार रोजी करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन सरपंच सौ. सुमन निळकंठराव मेटकर यांच्या हस्ते करण्यात आले. ब्राम्हणवाडा ग्रामपंचायत व नाकाडे हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी २१ जानेवारी रोजी विविध रुग्णासाठी मोफत शिबीर घेण्यात आले. या शिबीरात डॉ. संजय नाकाडे (फिजीशियन), डॉ. लोकेश गौंड (अस्थीरोग तज्ञ), शैलेश राजपुत, रामप्रसाद लोंढे, माधव मेटकर, नागेश नरवाडे, संदिप पाखरे, सुशांत सुर्यवंशी, चंदा कुरील, यांच्यासह अनेक तज्ञ डॉक्टरांनी मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबीरात महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अंतर्गत अल्प उत्पन्न असलेल्या कुटूंबासाठी नि:शुल्क व गुणवत्तापुर्व आरोग्य उपचार करण्यात आले. यावेळी कॅन्सर, ह्दयरोग शस्त्रक्रिया, मुत्रपिंढ व मुत्रमार्ग विकार शस्त्रक्रिया, मेंदू व मज्जा संस्था विकार, अस्थव्यंग, जठर व आतडे शस्त्रक्रिया, प्लास्टीक सर्जरी, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग आदी रुग्णाची तपासणी डॉ. संजय नाकाडे,डॉ. लोकेश गौंड आदी तज्ञ डॉक्टरांनी तपासणी करून औषध गोळ्यांचे वाटप करण्यात आले. या महाआरोग्य शिबीरात २०० रुग्णांनी या शिबीराचा लाभ घेतला. यावेळी ब्राम्हणवाडा सरपंच सौ. सुमन निळकंठराव मेटकर, ग्रामपंचायत अधिकारी मारोतराव कावरखे यांच्यासह दिलीप वायचाळ, प्रथमेश मेटकर, शिवाजी कोंगे, जगन वायचाळ यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन देवराव वायचाळ यांनी तर आभार पत्रकार शिवाजी मेटकर यांनी मानले.

# टँकरचे जादा देयक प्रकरण- संशयाची सुई लेखा परिक्षण कार्यालयाकडे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**
सेनगाव तालुक्यातील टँकरचे जादा देयक दिल्याच्या प्रकरणात संशयाची सुई स्थानिक निधी लेखा परीक्षण कार्यालयाकडे फिरू लागली आहे. या कार्यालयाने केलेल्या लेखा पररीक्षणात हा मुद्दा कसा उधड झाला नाही यावरून चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे आत या कार्यालयाचे अधिकारीही चौकशीच्या फेऱ्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सेनगाव पंचायत समिती कार्यालयाकडून टंचाईग्रस्त गावात सन २०१९-२० यावर्षी टँकरने पाणी पुरवठा केला होता. त्यानुसार पाणी पुरवठा केलेल्या कंत्राटदाराचे देयक पंचायत समिती कार्यालयाने अदा केले. त्यानंतर सुमारे ३० लाख रूपयांची जादा देयके अदा केल्याचे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या तपासणीमध्ये स्पष्ट झाले होते.

याप्रकरणी विभागीय आयुक्त कार्यालयाने सदर मुद्दा काढून दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यावरून सहाय्यक लेखाधिकारी नितीन बंडाळे, अनिल गव्हाणकर, वरिष्ठ सहाय्यक युवराज गवळी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. याबाबतचे आदेशही जिल्हा परिषदेने काढले आहेत.

दरम्यान, ज्या कालावधीत टँकरचे जादा देयक आदा केले गेले त्या कालावधीत जानेवारी २०२० व मार्च २०२० मध्ये स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालयाकडून सेनगाव पंचायत समितीचे लेखा परिक्षण करण्यात आले आहे. या लेखा परिक्षणात खर्च झालेल्या रकमेच्या व्हाऊचरवर तपासणी केल्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या देखील आहेत. या लेखा परिक्षणानंतर सर्व खर्च योग्य पध्दतीने झाल्याचे स्पष्ट झाले. मात्र त्यानंतर विभागी आयुक्त कार्यालयाने केलेल्या तपासणीमध्ये ३० लाखांचे जादा देयकाचा मुद्दा कसा निघाला असा सवाल उपस्थित केला जात आहे. स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालयाच्या तपासणीमध्ये हा मुद्दा का लक्षात आला नाही याबाबत उलटसुलट चर्चा होऊ लागली आहे. त्यामुळे पंचायत समितीचे लेखा परिक्षण करणारे स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालयाचे संबंधित अधिकारी व कर्मचारी देखील जबाबदार असल्याचे बोलले जात आून संशयाची सुई त्यांच्याकडेही फिरू लागली आहे. या प्रकरणात आता लेखा परिक्षण कार्यालयाची चौकशी होणार का याकडे जिल्हा परिषदेचे लक्ष लागले आहे.

सेनगाव पंचायत समिती नेहमीच वादग्रस्त राहीली असून याठिकाणी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर येथील स्थानिक पुढाऱ्यांचाही प्रचंड दबाव आणि हस्तक्षेप असल्याने कोणीही काम करण्यास धजत नाही.



**हिंगोली- येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलिस दल, राज्य राखीव दल, एनसीसी, स्काऊट आणि गाईड यांची परेडची जोरदार तयारी सुरू आहे. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### श्रीराम प्राणप्रतिष्ठेनिमित्त महाआरती, महाप्रसाद



हिंगोली- आयोद्या येथे २२ जानेवारी २०२४ रोजी श्रीराम मंदिर प्राण प्रतिष्ठानला एक पुर्ण झाले असून त्यानिमित्ताने हिंगोली शहरातील धडवाई हनुमान मंदिर येथे महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सावरमल आग्रवाल, दिपक निमोदीया, राजेंद्र हलवाई, राजू वसीया, कैलास श्रीनाथ, रुपेश मुदिराज बाबा घुगे, प्रदिप धडवाई महाराज, विशाल करवंदे यांच्यासह इतर उपस्थित होते. महा आरतीनंतर उपस्थित महिला भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आला.

### पिंपळदरीत चाईल्ड हेल्प लाईनद्वारा जनजागृती

हिंगोली- जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांच्या सूचनेनुसार औंढा नागनाथ तालुक्यातील पिंपळदरी येथील यात्रेमध्ये चाईल्ड हेल्पलाईन कक्षामार्फत चाईल्ड हेल्प लाईन १०९८ बाबत जनजागृती करण्यात आली. या जनजागृती कार्यक्रमात नागरिकांना ० ते १८ वर्षे वयोगटातील काळजी व संरक्षणाच्या दृष्टिकोनातून बालक आढळल्यास १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच त्यांना चाईल्ड हेल्पलाईनचे पॉम्प्लेट व लाऊड स्पीकरद्वारे माहिती देण्यात आली. यावेळी चाईल्ड हेल्पलाईनचे जिल्हा प्रकल्प समन्वयक संदीप कोल्हे व समुपदेशक अंकुर पाटोडे व पर्यवेक्षक विकास लोणकर, केस वर्कर राजरत्न पाईकराव, सुरज इंगळे, तथागत इंगळे तसेच यात्रेला आलेले नागरिक व बालके मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### भाजीमंडईत परिसरात कचऱ्यांचे ढीग

हिंगोली- शहरातील मध्यवस्तीत असलेल्या भाजीमंडईमध्ये कचऱ्यांचे ढीग जमा झाले असून त्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. भाजीमंडईमध्ये त्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. वारंवार याठिकाणी सडलेला भाजीपाला, प्लास्टीकच्या पिशव्या आदी टाकण्यात येत आहेत. तसेच कचऱ्याचे ढीग झाल्यामुळे वराह, गायी तसेच इतर जनावरांचा सुळसुळाट झाला आहे. दररोज नागरिक भाजीमंडईमध्ये ताजा भाजीपाला खरेदी करण्यासाठी जातात परंतु घाणीमुळे आरोग्य धोक्यात आले आहे.

# कोळसा येथील यात्रेला भाविकांची मोठी गर्दी, पोलिसांची करडी नजर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**
सेनगाव तालुक्यातील कोळसा येथे देव खंडोबा यांची यात्रा दरवषीप्रमाणे सुरू झाली असून या यात्रेला परिसरातील ३० ते ४० गावातील भाविक खंडोबारायाचे दर्शन आणि यात्रेला येतात. मागील काळात काहीशी वादग्रस्त असलेल्या या यात्रेत पोलिस निरीक्षक संतोष तांबे यांनी चोख पोलिस बंदोबस्त दिला असून पोलिसांची करडी नजर आहे.

सेनगाव तालुक्यातील कोळसा येथील यात्रेला सुरूवात झाली असून आज सकाळपासूनच पंचक्रोशीती भाविक खंडोबाच्या दर्शनासाठी तसेच यात्रेसाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी करीत असल्याचे दिसत आहे. यात्रेत विविध प्रकारचे संसारोपयोगी साहित्य, खेळणी तसेच विविध प्रकारची दुकाने लावण्यात आली आहेत. तसेच पारंपारीक पध्दतीने खंडोबाची महापूजा आरती करून या यात्रेला सुरूवात झाली आहे. येळकोट, येळकोट जय मल्हारचा गजर सर्वत्र ऐकायला मिळत आहे.

मागील काळात तमाशाच्या फडावरून याठिकाणी वादग्रस्त परिस्थिती निर्माण होत असल्यामुळे पोनि तांबे यांनी त्यांना यात्रेत परवानगी नाकारली असून असामाजिक तत्वावर पोलिसांची करडी नजर आहे.

# रूक्मीणी माध्यमिक विद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**
सेनगाव तालुक्यातील पळशी येथे रुक्मिणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे स्वयंशासन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांनी एक दिवसाचे शाळेचे संपूर्ण कामकाज सांभाळले.

मुिख्याध्यापक म्हणून अमोल खडसे पर्यवेक्षक पुनम मुटकुळे आणि शिक्षक म्हणून विद्यार्थी आणि विद्यार्थिनी सहभाग घेणारे प्रांजल दिपके, कल्पना रायवाडे, तायडे वेदिका, श्रद्धा तावरे, खडसे कोमल, राधिका जाधव, कल्याणी काळबांडे , हर्षदा मुळे , निकिता कुटे , ययाती पवार, लक्ष्मी पवार, मिरा मुळे, माधुरी पवार, श्रेयस पवार, सोनु कदिर, अबोली पवार, नेहा खिल्लारे, आरती काळबांडे, संघमित्रा खिल्लारे, पल्लवी लांडगे, प्रशांत मुळे, अनुराधा रोडगे, अश्विनी पातळे, वैष्णवी काळबांडे, संदेश सरकटे, प्रतिज्ञा खिल्लारे, आयोध्या लाभांडे, गणेश काळबांडे, श्रेया भिसे, वैष्णवी खरात, नंदिनी शिंदे, सानिका पवार क्रांती धांडे या विद्यार्थी सहभागी झाले होते. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव वाठोरेव तसेच संस्थेचे सचिव स्वप्निल वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. शाळेचे मुख्याध्यापक व प्राचार्य पी. के.तावरे, पर्यवेक्षक मोरे, शाळेतील सर्व शिक्षक पवार, चापके, गीते, ढवळे, घेवंडे, वाठोरे, शिखरे, कोटकर, गांधिले, श्रीमती खंदारे, बहीरे, घोगडे, ढोले, थोरात, लोणे, इंगोले, गावंडे, लोणकर, दवंडे, काळबांडे, खिल्लारी, शिखर, पोहकर, सतिष तावरे, संदिप तावरे, डोंगरे, पवार, बालाजी दिवाने यांची उपस्थिती होती.

# राज्य राखीव दलाच्या जवानाची राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जानेवारी**
येथील राज्य राखीव दलाच्या जवानाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवार दि २२ जानेवारी रोजी घडली आहे. शहर पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून जवानाच्या आत्महत्येचे कारण स्पष्ट झाले नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार राज्य राखीव दलाचे जवान जी एम शहाणे वय ४० हे प्रशासन कंपनीमध्ये कार्यरत आहेत. परभणी येथील रहीवाशी असलेले जवान शहाणे हे सन २००८ मध्ये हिंगोलीच्या राज्य राखीव दलात भरती झाले होते. सध्या गटातील शासकीय निवासस्थानात पत्नी व एका लहान मुलीसह राहतात.

दरम्यान, मागील काही दिवसांपवूर्वी त्यांच्या पत्नी बाहेरगावी गेल्या होत्या. त्यामुळे ते एकटेच घरी होते. आज सकाळी त्यांच्या पत्नीने त्यांच्याशी मोबाईलवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याशी संपर्क झाला नाही. सुमारे अर्ध्यातासाच्या प्रयत्नानंतरही संपर्क होत नसल्याने त्यांच्या पत्नीने शेजारी असलेल्या कुटुंबाला याची माहीती दिली. शेजाऱ्यांनी दरवाजा वाजविला मात्र आतून प्रतिसाद आला नाही. त्यामुळे खिडकीतून पाहणी केली असता जवना शहाणे यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. या घटनेची माहीती हिंगोली शहर पोलिसांना दिल्यानंतर पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, जमादार अशोक धामणे, गणाजी पोटे, संतोश करे, धनंजय क्षीरसागर यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच राखीव दलाचे सहाय्यक समादेशक एस एस तिडके यांनीही घटनास्थळी भेट दिली आहे. पोलिसांनी जवान शहाणे यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय यग्णालयात हलविला आहे. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून दलात शोककळा पसरली आहे.

# वसमत येथे पाणी गुणवत्ता प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २२ जानेवारी**
येथील पंचायत समिती वसमत वतीने प्रसाद मंगल कार्यालय, बसमत येथे तालुका स्तरीय पाणी गुणवत्ता विषयक प्रशिक्षण/कार्यशाळा, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष व पंचायत समिती संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.

यावेळी गटविकास अधिकारी तोटावाड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली यावेळी सहा गट विकास अधिकारी- सूनील अंभुरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ काळे, उपविभागीय अभियंता नांदे, तालुकाविस्तार अधिकारी छ्त्रपती चव्हाण, माधव सूर्यवंशी,जल निरीक्षक महेश थोरकर, सल्लागार राजेंद्र सरकटे, तज्ज्ञ प्रथमेश धोंगडे, बी सी खंदारे, यांची उपस्थीती होती. सदरील कार्यशाळेत भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा येथील प्रफुल्ल विनकरे यांनी पाणी गुणवत्ता विषयक एफटीके. किटच्या माध्यमातून गाव स्तरावरील पाणी नमुने तपासणी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनामुळे दूषित पाणी नमुना तपासणी गाव स्तरावर तात्काळ उपलब्ध होऊन दूषित पाणी शुद्धीकरण लवकर करता व जोखीम टाळता येईल असा उद्देश कार्यशाळेच्या निमित्ताने व्यक्त करण्यात आला. यावेळी प्रशिक्षणाला ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य सेवक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, आशा गट प्रवर्तकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी रविकुमार खिराडे, दादाराव अहिरे यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




बीड : यंदा रब्बीतील पिके बहरली असून चांगले उत्पादन हाती लागेल अशी आशा आहे. बीड शिवारातील बहरलेले ज्वारीचे पीक. (इन्सेटमध्ये) दाण्यांनी भरलेले कणीस. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)

# सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारूर कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्ष पदी बालाजी प्रकाश शिनगारे तर सचिव पदी मनोज दादा जगताप

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२२ जानेवारी**

स्व. नामदेव भाऊ शिनगारे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारुरची बैठक १८ जानेवारी रोजी संपन्न झाली. यावेळी अध्यक्षपदी बालाजी शिनगारे उपाध्यक्षपदी प्रताप शिनगारे तर सचिवपदी मनोज जगताप यांची निवड करण्यात आली.




किल्ले धारुर शहरात स्व. नामदेव भाऊ शिनगारे यांच्या संकल्पनेतून व त्याच्यानंतर सुदर्शन भैय्या शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ३६ वर्षपासुन छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या थाटामाटात उत्सहात साजरी करण्यात येते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारुर वतीने शिवजयंती थाटामाटात साजरी करण्यात येणार आहे त्या अनुषंगाने १८ जानेवारी वार शनिवार रोजी सुदर्शन भैय्या शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारुर अध्यक्ष पदी बालाजी प्रकाश शिनगारे,उपाअध्यक्ष पदी प्रताप भाऊ शिनगारे,सचिव पदी मनोज दादा जगताप,सहसचिव पदी संकेत शिनगारे,कोषाध्यक्ष पदी आण्णासाहेब गोन्ने,सहकोषाध्यक्ष पदी जीवन पुजदेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी मिरवणुक प्रमुखपदी नागेश भाऊ शिनगारे,श्रीनिवास शिनगारे,भागवत लांडगे,प्रशांत बापु शिनगारे,विश्वास शिनगारे,अशोक जगताप,अमोल शिनगारे,बालाजी शिनगारे,हरिभाऊ मोरे,प्रशांत शिनगारे,अमरजित शिनगारे,अजित शिनगारे, बाळासाहेब शिनगारे,महेश साखरे,अशोक शिनगारे,धनंजय शिनगारे,आविनाश साखरे,विजय शेळके यांनी निवड करण्यात आली.

यावेळी निलेश शिनगारे,आकाश शिनगारे, पवन शिनगारे,दत्ता धुमरे,यांच्यासह असंख्य शिवप्रेमी शिवभक्त उपस्थित होते.

# वसुंधरा माध्यमिक विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

## शालेय क्रीडा स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडू घडतात-डॉ.हनुमंत सौदागर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जानेवारी**

विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात खेळ अत्यंत महत्त्वाचा असतो. या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडू घडतात असे मत उदघाटक डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते पैठण येथील वसुंधरा माध्यमिक विद्यालयात क्रीडा स्पर्धा उद्घाटन कार्यक्रमात उद्घाटक म्हणून बोलत होते. उपस्थितांच्या हस्ते नाणेफेक करून कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

प्रति वर्षी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त कै.भुजंगराव सेवा प्रतिष्ठान सारणी संचलित वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पैठण मध्ये क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात.क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनासाठी उद्घाटक डॉ. हनुमंत सौदागर, परमेश्वर चौधरी यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांमध्ये बंधुता, समता, संघटन कौशल्य, शारीरिक आरोग्य संपन्नता बौद्धिक विकास इत्यादी गुण विकसित करण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. सौदागर यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना या विद्यालयातून प्रियंका इंगळे सारखे भारतीय संघाचे नेतृत्व करणारे खेळाडू निर्माण व्हावेत आणि होतील असा आशावाद व्यक्त करून क्रीडा स्पर्धेतील सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.मुख्याध्यापक सुशीलकुमार गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा विभाग प्रमुख अनिल सरवदे यांच्या नियंत्रणात घेतल्या जात आहेत या स्पर्धेसाठी इयत्ता पाचवी ते बारावी विद्यार्थी मोठ्या उत्साहात सहभागी होतात.या स्पर्धेसाठी सहशिक्षक अशोक चौधरी, हनुमान चौधरी श्रीमती तोडकर, श्रीमती डाके ,नवनाथ गायकवाड, आबासाहेब बिक्कड,अतुल साखरे, अमित शिनगारे, शशिकांत पवार, मनोज शिनगारे,प्रसाद कुलकर्णी, श्री बारसागडे यांचे विशेष योगदान आहे. कबड्डी स्पर्धेसाठी एका संघाला उपस्थितांच्या हस्ते [illegible] आली.

# लाखोंच्या संख्येने एकच वारी २५ जानेवारी चलो अंतरवली

## मनोज जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे यांचे आव्हान

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२२ जानेवारी**

केज तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवांनी आपल्या मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार सांगावा आलाय यायलाच लागतंय सामुहिक आमरण उपोषण दि.२५ जानेवारी २०२५ रोजी सामुहिक अमरण उपोषणाला लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मनोज जरांगे पाटील समर्थक , अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.तरी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी दीड ते दोन वर्ष झाले मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील व सकल मराठा समाज बांधव जिवाचे रान करुन झगडत आहे तरी सुद्धा सकल मराठा समाज बांधवांना सरसगट ओबीसी मधुन आरक्षण मिळाले नाही म्हणून येणाऱ्या २५ जानेवारीला मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार आपल्या मुलांना न्याय मिळवून देण्यासाठी लाखोंच्या संख्येने सामुहिक अमरण उपोषणाला बसण्यासाठी अंतरवली सराटी येथे सकल मराठा समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.



# अंबाजोगाई तालुक्यातील ४२ सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी जात वैधता प्रमाणपत्र दाखल न केल्याने अपात्र

## तहसीलदार यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे प्रस्ताव दाखल करताच जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला अपात्रतेचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ जानेवारी**

सन २०२० नंतर झालेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकीत राखीव जागेवर निवडणूक लढवून विजयी झालेल्या सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्यांनी एक वर्षाच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असताना अंबाजोगाई तालुक्यातील तब्बल ४२ सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने सरपंच व सदस्यांना अपात्र करण्यासंदर्भात अंबाजोगाई तहसील कार्यालयाकडून जिल्हाधिकारी कार्यालयाला प्रस्ताव जाताच बीडचे जिल्हाधिकारी यांनी त्या ४२ सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांना अपात्र करण्याचा धाडसी निर्णय घेतल्याने अंबाजोगाई तालुक्यातील ग्रामीण भागात प्रचंड खळबळ उडाली आहे अपात्र सरपंच व सदस्य पुढील काळात काय भूमिका घेतात येणारा काळच ठरवेल

अंबाजोगाई तालुक्यातील सरपंच व सदस्य कोणत्या गावचे अपात्र झाले त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.अंजनपुर- इस्ताळकर छाया आप्पा २)उजनी- आगळे केवळ ज्ञानोबा, राऊत सोनाली सावता, गायकवाड स्वर्णमाला संजय, मुंडे प्रदीप रामराव ३) कोपरा - भारती शारदा लाला (सरपंच), काटे ईश्वर दासू ,भारती चंद्रभागा युवराज कांबळे, शाहूबाई ग्यानदेव ४) खापरटोन -चाटे पारूबाई लक्ष्मण ५) गित्ता - कळसाईत रेखा तुकाराम ६)घाटनांदुर -कोकाटे सुषमा नितेश, कसबे स्वाती सचिन, कुसळे चंद्रकला शिवाजी ७)चोथेवाडी- गायकवाड पद्दमिन यशवंत, निळे विजूबाई श्रीपती ८)तट बोरगाव- गायकवाड छाया चंद्रकांत ,भोसले मीरानंद कुमार ९)तडोळा -कांबळे ज्ञानेश्वरी विष्णू (सरपंच) १०) तळेगाव घाट -कोमल शरद कटके ११)तेलघणा - केंद्रे मुद्रिका बाई शामसुंदर १२)देवळा - सोनवणे मोनिका भीमा, यशवंत कोमल बजरंग,१३) नांदडी- शकुंतला भास्कर वेदपाठक १४)निरपणा - सुवर्णमाला श्रीराम वाघमारे १५) बर्दापूर - पुष्पा हरिश्चंद्र शिनगारे १६)बाभळगाव- भालेराव रूक्मीनबाई कुंडलिकराव १७) भतानवाडी- कांबळे कमल बळीराम १८) भारज -अविनाश पांडुरंग शाहीर १९)मगरवाडी / दस्तगीरवाडी- पार्वती महादेव राऊत, साळे भगवान कोंडीबा २०)माकेगाव- कांचन नंदकिशोर वाघमारे २१) राजेवाडी- पडुळे शारदा प्रल्हाद २२) वरवटी- चाटे अर्जुन जगन्नाथ २३) सनगाव- मुंडे आशा अश्रुबा २४) सेलूअंबा - कुडके उषाबाई राजाभाऊ, पल्लवी अशोक भडके,

२५)सोनवळा - माळी बलभीम जनार्दन २६) हातोला- ओगले आनंद कचरू ,खतीले सुमन अर्जुन ,ओगले गीता दत्ता आदींचा अपात्रतेमध्ये समावेश आहे

# स्वा.सावरकर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थांनी कॉपी मुक्ती परिक्षा देण्याची घेतली शपथ



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जानेवारी**

फेबु २० २५ मध्ये १२वी बोर्ड प्रात्यक्षिक परिक्षा २४ जाने २०२५ पासून प्रारंभ होत आहेत

व लेखी परिक्षा फेब्रु २०२५ पासून सुरु होत आहे कॉपी मुक्त अभियाना अतर्गत दि २ २ जाने २०२५ मंगळवार रोजी स्वा सावरकर कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थांनी *कॉपी मुक्त परिक्षा देण्याची शपथ घेतली* .

यावेळी प्रमुख उपस्थित मान्यवर विद्या सभा उपाध्यक्ष उमेश जगताप, प्रा चंद्रकांत मुळे, प्राचार्य विठ्ठल काळे उपमुख्याध्यापक माधव जोशी प्रा बाळासाहेब साळवे विभाग प्रमुख , प्रा दीपक देशमुख प्रा शशिकांत पसारकर , प्रा संतोष जोशी यांनी विद्यार्थ्यांना शपथ दिली.महाविद्यालयातील कला, विज्ञान, एच .एस .व्ही . सी . विभागातील प्राध्यापक ,विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# लोकमान्य टिळक विद्यालयात ई-कचरा जनजागृती व संकलन अभियानाचे उद्घाटन




**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ जानेवारी**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ई-यंत्रण २०२५ व भा.शि. प्र.संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण गतीविधीच्या माध्यमातून पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात दि.२२ जानेवारी २०२५ बुधवार रोजी ई-कचरा जनजागृती आणि संकलन अभियानाचे उद्घाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.संजयराव विभूते यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी सर्व शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.

या अभियानाच्या माध्यमातून प्रार्थना सभेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना तसेच गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना ई-कचरा म्हणजे काय? त्याचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम,त्याचे संकलन याबाबत जनजागृती करण्यात आली.

या अभियानात प्रत्येकाने सक्रीय सहभाग घ्यावा आणि गावात देखील याची जनजागृती करून सर्वांनी जास्तीत जास्त ई-कचऱ्याचे संकलन करावे असे विद्यालयाच्या वतीने अभियान प्रमुख श्री.संजयराव विभूते आणि स्वयंसेवक श्री.नितीन चौधरी यांनी आवाहन केले.

सदरील अभियानातून जमा होणाऱ्या ई-कचऱ्याचे संकलन विद्यालयात दि.२६ जानेवारी २०२५ पर्यंत करण्यात येणार आहे.

# खोलेश्वर महाविद्यालयातआजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आयोजित दोन दिवशीय कार्यशाळेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ जानेवारी**

खोलेश्वर महाविद्यालय, आंबेजोगाई व डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आयोजित दोन दिवशीय व्यवसाय व समुपदेशन कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले .या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली .आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे विभाग प्रमुख डॉ . बाळासाहेब मुंडे यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले .

त्यांनी आपल्या प्रस्ताविकात ही दोन दिवशीय समुपदेशन कार्यशाळा आयोजित करण्याचा उद्देश सांगितला. आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग निर्माण करण्या

पाठीमागील हेतू काय आहे तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण व्हावे जीवन जगताना आवश्यक असणारे मूल्य विद्यार्थ्यांच्या मनावरती रुजविण्यासाठी शिक्षण दिले जाते .त्यामध्ये ग्रामीण पत्रकारिता , ग्रंथालयाचा कोर्स यासारख्या विविध स्वरूपाचे कोर्स या विभागाच्या माध्यमातून राबविले जाते . असे त्यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगितले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे संचालक डॉ . सुधाकर शेंडगे या उद्घाटनपर भाषणात म्हणाले की, आजीवन शिक्षण ही काही तरी वेगळी गोष्ट आहे. विद्यार्थी खरंच शिक्षण घेत आहेत का त्यातील १०% टक्के विद्यार्थी हे मला काही तरी शिकायचे आहे असे विद्यार्थी आहेत तर बाकीचे ९०% टक्के विद्यार्थी हे डिग्री पूर्ण करण्यासाठी शिक्षण घेत आहेत .ते पुढे बोलताना म्हणाले की ,शिक्षण क्षेत्रामध्ये मुलांपेक्षा मुलींचे शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे या मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व सावित्रीबाई यांनी दाखवून दिले. शिक्षण खरे कुठे आहे ते सांगताना पुढे म्हणाले की, शिक्षण घेत असताना संस्काराची गरज आहे खरे शिक्षण हे वर्गाच्या बाहेर आहे चार भिंतीतील शिक्षणापेक्षा वर्गाच्या बाहेरील शिक्षण हे कधीही कौशल्य विकसित करणारे असते .

कोणत्याही वर्गात नापास होणे म्हणजे शिक्षण संपले असे नाही तर नापास झालेली माणसे सुद्धा इतिहास घडवू शकतात असे त्यांनी आपले मत या प्रसंगी मांडले. यश मिळण्यासाठी जिद्द चिकाटी विश्वास असला पाहिजे आजीवन शिक्षण विभागाने कौशल्य शिक्षण याची सुरुवात केली आहे . छोटे छोटे कोर्सेस निर्माण केले आहेत. त्याद्वारे शिक्षण घेऊन विद्यार्थी स्वतःला सिद्ध करून रोजगार मिळवतात पुढे बोलताना म्हणाले की ,रोज नवीन गोष्टी आत्मसात करायला शिका त्यामुळे तुमचे भविष्य उज्वल होईल असे या प्रसंगी त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.दिपक फुलारी सर हे आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना म्हणाले की, शिक्षण शाळा - महाविद्यालयातील शिक्षणावर अवलंबून न राहता बाहेरील कौशल्य आधारित शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या पायावर उभा राहिले पाहिजे असे त्यांनी मत अध्यक्ष समारोपत बोलताना केले .यानंतर पहिल्या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा . सतीश हिवरेकर यांनी 'नवीन शैक्षणिक धोरण' याविषयी आपले विचार मांडले. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की , भारताचे शैक्षणिक धोरण उच्च प्रतीचे होते. त्यात प्रामुख्याने तक्षशिला व नालंदा विद्यापीठ मधून हे शिक्षण दिले जात होते त्या विद्यापीठामधून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले होते .मात्र स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी येथील शिक्षण पद्धती मुळापासून संपवण्यासाठी प्रयत्न केले व त्यासाठी त्यांनी इंग्रजी शैक्षणिक धोरण इथे रूजविण्यासाठी प्रयत्न केले.

शिक्षकांत काही बदलासाठी नवीन शैक्षणिक धोरण निर्माण केले. १९८६ चे नवीन शैक्षणिक धोरण आले त्यात ३५ वर्षे हे शिक्षण सुरू होते. त्यानंतर बहिस्थ शिक्षणास सुरुवात झाली . काळ बदलला आवश्यक गरजा बदलल्या त्यानुसार हे शिक्षण बदलावे लागले त्यामुळे त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचे काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यही याप्रसंगी सांगितली. पुढे म्हणाले की, शैक्षणिक धोरणातील असलेल्या बदलानुसार मातृभाषेतून शिक्षण असले पाहिजे असे या नवीन शैक्षणिक धोरणात मान्य करण्यात आले आहे .ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. त्यांना त्यांच्या आवडीचे विषय घेता आले पाहिजेत तसेच भारताची ज्ञान परंपरा मोठी आहे. त्या परंपरेचा वापर या शैक्षणिक धोरणात झाला पाहिजे. असे मत त्यांनी याप्रसंगी मांडले.

शेवटी या सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ . बिभीषण फड यांनी या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला .

दुसऱ्या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठी विभागाचे प्राध्यापक गौतम गायकवाड यांनी लेखन व संभाषण कौशल्य याविषयी आपले विचार मांडले. या विषयावर बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांना रोजगार मिळवण्यासाठी लेखन आणि संभाषण कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे . म्हणून कौशल्य शिक्षण घेऊन आपण आपल्या पायावर उभे राहू शकता. ज्ञानाच्या बरोबर कौशल्य शिक्षण घेणे आवश्यक आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनीआपल्या संभाषण व लेखन कौशल्यावर विशेष भर देऊन ज्ञान मिळविले पाहिजे असे मत त्यांनी या प्रसंगी मांडले .या सत्राचे अध्यक्ष वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ .सुभाष पटेकर यांनी अध्यक्षीय समारोप केला .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा.रमण झरीकर यांनी केले . या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्रचार्य डॉ . कुंबेफळकर, उपप्राचार्य डॉ बिभीषण फड ,उपप्राचार्य डॉ .फुलारी सर ,प्राध्यापक बंधू- भगिनी तसेच विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com



# पिवळ्या, केशरी, लाल फुलांनी करडई शेती बहरली

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २२ जानेवारी**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर परिसरात करडईचे पीक पिवळ्या, केशरी, लाल भरघोस काटेरी फुलांनी डवरले आहे. या लदबदलेल्या फुलांनी परिसर पिवळाधम्मक सर्वदूर फुलून गेला! रब्बी हंगामात ज्वारी, हरभरा, गहू आदि पिकांबरोबर शेतकरी करडई हे पीक दरवर्षी घेत असतात.

करडई पेरणी करतेवेळेस जर मातीत ओलावा भरपूर असला तर करडई पीकाची उगवण क्षमता जोमदार होऊन शेतकऱ्यांना याचा आर्थिक फायदा होतो. काही शेतकरी या गळीत धान्याचा आंतरपीक म्हणूनही नफा घेत असतात, तर काही घरगुती तेलासाठी पेरणी करतात. या करडई कडधान्याचे पेरणी क्षेत्र परिसरात बऱ्यापैकी शाबूत आहे. करडई गळीत धान्याचेही आता बाजारात सुधारित वाण उपलब्ध होताना दिसून येत आहे. करडईचे मूळ जमिनीत खोलवर जात असल्याने कमी ओलाव्यातही हे पीक येते, त्याचबरोबर पाण्याचा अधिक ताणही हे पीक सहन करू शकते.महाराष्ट्रात भुईमूग पिकाच्या खालोखाल करडईचे पीक महत्त्वपूर्ण आहे.सदरील पिकासाठी मध्यम ते भारी जमीन फार उपयोगाची ठरते. शेतकऱ्यांना खाद्यान्न तेलासाठी किंवा थोडाफार आर्थिक नफा ही करडई उत्पन्न हाती हमखास देऊन जाते.

## 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ जानेवारी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्वागत कक्षामध्ये दि. २२ जानेवारी रोजी प.पू. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम.के. पाटील यांनी प्रथम प. पू. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास चंदनहार व स्वागत कक्षामध्ये प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



यावेळी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, आयक्यूएसी विभागाचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी, उपकुलसचिव डॉ. रवी सरोदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सहा. कुलसचिव डॉ. सरिता लोसरवार, अधिसभा सदस्य शिवाजी चांदणे, शेख सिकंदर अली, कुंदा पाटील, हरीशकुमार पाटील, गोविंदराव हंबर्डे, रामदास खोकले, संभाजी धनमणे, शिवाजी कल्याणकर, बबन हिंगे, यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी प.पू. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## संक्षिप्त वृत्त



### जेष्ठ सामाजिक कार्येकर्ते रामराव कंधारे समाजरत्न पुरस्कारांने सन्मानित !

**मुखेड**-तालुक्यातील मौजे चोंडी गावचे भूमिपुत्र जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामराव कंधारे योध्दा महाराष्ट्राचा समाजरत्न पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र युवा फॉउंडेशनचे अध्यक्ष ॲड. आकाश पुजारी यांच्या हस्ते भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामराव मरिबा कंधारे महाराष्ट्राचा योध्दा सन्मान पुरस्कारांने पुणे येथे सहकुटुंबास गौरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते जयसिंगराव तात्या शेंडगे तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष राहुल पा. चितळकर, शिवसेना ओबीसी व्हिजीएनटी प्रदेशाध्यक्ष तथा शेळी मेढी महामंडळ चे उपाध्यक्ष बाळासाहेब किशवे, शिवसेना ओबीसी व्हिजीएनटीचे राज्य समन्वयक मारुती जानकर, शिवसेना ओबीसी व्हिजीएनटीचे नेते तथा उपजिल्हा प्रमुख प्रा. राजेंद्र लाड, शिवसेना ओबीसी व्हिजीएनटी परभणी जिल्हा अध्यक्ष मदन रेनगडे, बजरंग कंधारे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपा नेते भागवत काटकर यांनी केले. तालुक्यातील चोंडी गावाचे नाव राज्य पातळीवर नावलौकिक करणे हे मुखेड तालुक्यासह संबंध नांदेड जिल्हासाठी अभिमानाची बाब आहे. चोंडी येथील भूमिपुत्र जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामराव मरिबा कंधारे यांना महाराष्ट्राचा योद्धा समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबदल खा.डॉ. अजित गोपछडे, मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड, देगलूर-बिलोली चे आमदार जितेश आंतापुरकर, माजी आमदार अविनाश घाटे, माजी नगराध्यक्ष गंगाधरराव राठोड, ॲड. खुशाल पा. उमरदरीकर, डॉ. माधवराव पा. उच्चेकर, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष विरभद्र हिमगीरे, भाजपाच्या महिला तालुकाध्यक्ष प्रा. अनिताताई चोंडीकर, भाजपा शहराध्यक्ष राजेश गजलवाड, सुधीर चव्हाण, सदाशिव पा.देवकते, प्रा. प्रकाश पा चोंडीकर, चोंडीचे पो.पा.सचिन चोंडीकर, चेअरमन विकाश नाईक, सरपंच मारोती नाईक, अल्पसंख्यांक तालुका अध्यक्ष मुजाहिदीन चोंडीकर, सरपंच प्रतिनिधी आदित्य पा.चोंडीकर, ॲड. रणजित जामखेडकर, उपसरपंच अनिल हसनाळकर, माजी सरपंच पांडुरंग कंधारे, विठ्ठलराव जामखेडकर, राम महाराज शिरुळे, विक्रम पाटील, शंकर इबितदार, कौशिक पा.किशवे, रामराव पा. अचेगावे, विनोद पा.बसापुरे, विनायक चोंडीकर यांच्यासह तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून कंधारे परिवारास शुभेच्छा दिल्या.

### श्री संत सेवालाल महाराज जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी विष्णू चव्हाण यांची निवड

**लोहा**-श्री संत सेवालाल महाराज जयंती निमित्य लोहा येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या जयंती महोत्सव कमिटीच्या अध्यक्षपदी विष्णू व्यंकटी चव्हाण तर उपाध्यक्ष पदी विकास पंडित राठोड, विलास गणेशराव राठोड, सचिव पदी बळीराम मोतीराम जाधव, सहसचिवपदी जयपाल रुस्तुम पवार, कोषाध्यक्ष अविनाश शिवाजी पवार,बंडू उत्तम राठोड, सहकोषाध्यक्ष श्रीराम दामू राठोड,नितीन साहेबराव चव्हाण, कार्याध्यक्ष अनिल उत्तम जाधव व लक्ष्मण उत्तम चव्हाण यांची सर्वानुमते खेळीमेळीच्या वातावरणात निवड करण्यात आली. या बैठकीस शिव जाधव, संकेत चव्हाण, किरण राठोड,सचिन चव्हाण, नितीन चव्हाण, मीखा राठोड,संजय पवार, रवी चव्हाण आदीसह समाजातील बांधव उपस्थित होते.



## मुदखेड येथे कायदे विषयक कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २२ जानेवारी**



महाराष्ट्र शासनाचे कालबद्ध कार्यक्रमानुसार पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये मुदखेड पोलीस ठाणे येथे दि. २२ जानेवारी रोजी मुदखेड पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, व गुन्हे शोध पथकाचे किशोर पाटील यांनी कार्यशाळेचे आयोजन केले.

या कार्यशाळेत भारतीय न्याय संहिता या विषयावर माहिती देण्यासाठी मुदखेड न्यायालयाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता एस. बी. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेचे प्रस्ताविक पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी केले. यानंतर एस. बी. पवार यांनी कार्यशाळेत उपस्थित असलेल्या तालुक्यातील पोलीस पाटील तंटामुक्ती अध्यक्ष प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार बांधवांना भारतीय न्याय संहिता या नवीन कायद्याविषयी माहिती दिली. यामध्ये नवे गुन्हे जसे समाविष्ट करण्यात आले आहेत तसे काही नवीन शिक्षेचे प्रकारे समाविष्ट करण्यात आलेले आहेत. यादी, दंड, जप्ती, साधी कैद, तीन वर्षापर्यंत कारावास, अजन्म कारावास, सात वर्षापर्यंत फक्त मजुरी, फाशी असे मुख्य प्रकार असायचे यामध्ये आता नव्याने छोट्या मोठ्या गुन्ह्यासाठी ज्यांची ज्यांची शिक्षा अधिकाधिक तीन वर्षे आहे. अशा गुन्ह्यासाठी कम्युनिटी सर्विस म्हणजे (सामाजिक सेवा) नावाची शिक्षा चालू होणार आहे. तसेच महिलांन विषयी नविन कायदा, ऑडिओ, व्हिडिओ, करताना कसे करावे यावरही थोडक्यात माहिती एस. बी. पवार यांनी दिली. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन पत्रकार संजय कोलते यांनी केले तर आभार एपीआय कांबळे यांनी मानले. या कार्यशाळेप्रसंगी सहाय्यक पोलिस निरिक्षक बी. आर. कांबळे, सहाय्यक पोलिस निरिक्षक खेडकर, गुन्हे शोध पथकाचे किशोर पाटील, ,कॉग्रेस कमिटी शहराध्यक्ष कैलास गोडसे, जेष्ठ पत्रकार जयराम वने, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, तालुक्यातील पोलिस पाटील व महिला पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष आणि पत्रकार बांधवांची उपस्थीती होती.

## आश्रम शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २२ जानेवारी**

लोहा येथील सोमसिंग नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन पुष्पावती शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव स्वप्नील गोविंदराव जाधव आणि राणी स्वप्निल जाधव यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वर्गीय सोमसिंग नाईक माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक पि. एन. संगेवार तर प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी डी. आर. शिंदे, मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष शेख अहमद, सरचिटणीस रत्नाकर महाबळे ,हुलेवाडी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गणेश राजारूपे,बी डब्लु चव्हाण, सांस्कृतिक विभाग प्रमुख बापूसाहेब कापुरे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंबुलगेकर यांनी आश्रम शाळा आज पर्यंत कशा पद्धतीने प्रगती केली याविषयीचा आढावा त्यांनी आपल्या प्रास्ताविकास सांगितला तर निवेदन चोले यांनी केले यावेळी विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर आपली कला सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या वेळी शिक्षण विस्तार अधिकारी शिंदे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील न्यूनगंड बाजूला सारून या स्पर्धेच्या युगात आपली क्षमता देखील दाखवून देण्याची गरज आहे. त्यासाठी त्यांनी अथक परिश्रम करून आपले व आपल्या शाळेचे नावलौकिक करावे . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पीएम राठोड, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक पी. एन. संगेवार, राणी जाधव मॅडम गंपू राठोड, चोले, फाजगे, शिंदे, जोंधळे, वाघमारे, नाईक, घोडजकर यांच्या सह सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांनी निर्भयपणे परीक्षेला सामोरे जावे : सुनिल सोनूले

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २२ जानेवारी**

तुमच्यासाठी प्राध्यापकांनी खुप मेहनत घेतली आहे त्यामुळे तुमचे परीक्षा केंद्र कुठे आले याची तमा न बाळगता तुम्ही निर्भयपणे परीक्षेला सामोरे जा असे प्रतिपादन आदर्श विद्यार्जन मंडळाचे सचिव सुनील सोनूले यांनी पंचशील उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ प्रसंगी केले.संस्थेचे कोषाध्यक्ष शिवाजीराव तावडे, संचालक जगदीश कदम, मुख्याध्यापक बंडेवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पुढे बोलताना सोनुले म्हणाले की, आपल्या जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्रीकर परदेशी यांनी कॉपीमुक्ती अभियान राबवल्यापासून आपल्या जिल्हा कॉपीमुक्त झाला आहे. याप्रसंगी अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना परीक्षे संदर्भात मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा.घाटे, प्रा.देशमुख, प्रा.खिसे, प्रा.हापसे, प्रा.गुंडे, प्रा.पानपट्टे, प्रा.चव्हाण, श्रीमती खुळे, श्रीमती पतंगे, श्रीमती पावडे, प्रा.राठोड आदींनी परिश्रम घेतले अल्पोपहारा नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.





**मुखेड-येथील आगारात मान्यताप्राप्त एस.टि. कामगार संघटना यांच्या नवीन फालकाचे अनावरण माजी नगराध्यक्ष गंगाधरराव राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विभागीय एस.टी. अध्यक्ष एम. बी. बोर्डे, विभागीय सचिव विनोद पांचाळ, विपिन चव्हाण यावेळी व्यंकटराव लोहबंदे, नासर पठाण, किशोरसिंह चौहान, सुधीर चव्हाण, राजेश गजलवाड, करण रोडग, विनोद दंडलवाड, राजू राठोड, एस. आर. माचेवाड, सुभाष पवार, एस. डी. जाधव, एन. टी. कोरे, के. एस. पाटील, टि. एन. पाटील, गजानन अकुलवाड, विकास चव्हाण, सचिन चव्हाण, गिरीराज औरादे, हनुमंत मोटरगेकर आदी उपस्थित होते. (छाया-गणेश आंबेकर )**

### निवृत्तीवेतन धारकांसाठी पेन्शन अदालत

**नांदेड**-महालेखापाल यांच्या अधिनस्त अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या द्वारे निवृत्तीवेतन धारकासाठी व निवृत्तीवेतनविषयक एजी कार्यालयात होणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यात येणार आहे. यादृष्टिने पेन्शन अदालतीचे आयोजन २७ जानेवारी २०२५ रोजी नियोजन भवन नांदेड येथे करण्यात आले आहे. कार्यालयातील लेखा विषयक कामकाज करणारे कर्मचारी सेवानिवृत्तीवेतन धारकांनी आपल्यास्तरावर अवगत करावे असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी यांनी केले आहे.

## चक्री ग्रामस्थांच्यावतीने ग्राम स्वच्छतेसाठी पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**निवघा (बा),दि. २२ जानेवारी**



तालुक्यातील मौजे चक्री ग्रामपंचायतची दृश्यमान स्वच्छता योजने अंतर्गत नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनलवाल यांच्या प्रोत्साहनाने व हदगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कैलास बळवंत यांच्या मार्गदर्शनाखाली चक्री हे गाव दत्तक घेतले आहे.

याअनुषंगाने चक्री येथील ग्रामपंचायत कार्यालयाला हदगाव पंचायत समितीचे समुह समनव्यक अधिकारी सचिन डुरे व ग्रामपंचायत अधिकारी एस. व्ही.कौशल्य यांनी मौजे चक्री येथे भेट देऊन चक्री येथील ग्रामस्थांची भेट घेत गावातील व्यक्तिक स्वच्छता व सार्वजनिक स्वच्छते विषयी जनजागृती केली. चक्री हे गाव स्वच्छ व निरोगी करण्यासाठी गावातील सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांसह गावातील नवयुवक मंडळींनी विचार विनिमय करत गावच्या स्वच्छतेसाठी आठवड्यातील मंगळवार या दिवशी सर्वांनी श्रमदान करून आपला गाव स्वच्छय, सुंदर, निरोगी व प्लास्टिक मुक्त गाव बनवण्यासाठी गावात जनजागृती करून पुढाकार घेतला यावेळी पंचायत समिती हदगावचे समुह समनव्यक अधिकारी सचिन डुरे, ग्रामपंचायत अधिकारी एस. व्ही.कौशल्य, सरपंच प्रतिनिधी चंद्रमुनी पाईकराव, तंटामुक्ती अध्यक्ष सुधाकर महाजन, पंजाबराव खंडाळे, गणपतराव अध्यक्ष, देवानंद सूर्यवंशी, अरविंद सूर्यवंशी, कोंडबाराव महाजन, अंकुश तुपकरी, दिलीप कृष्णपुरे, अशोक सूर्यवंशी, विष्णु मिराशे व मराठी पत्रकार संघांचे तालुकापाध्यक्ष दिपक सुर्यवंशी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## सेवानिवृत्त अंगणवाडी सेविकेचा प्रजासत्ताक दिनी आत्मदहनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी,दि. २२ जानेवारी**

सेवानिवृत्त होऊन सहा वर्षे उलटून सुद्धा एलआयसीची रक्कम एक रक्कमी नाही मिळाल्याने एका ७२ वर्षीय वृद्ध महिलेने थेट आत्मदहनाचा इशारा मुख्य कार्यकारी अधिकारी नांदेड यांच्याकडे दिलेल्या निवेदनातून दिला आहे. मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथील रहिवासी असलेले मुक्ताबाई विठ्ठलराव रापतवार वय ७२ वर्ष या १९८२ ला अंगणवाडी सेविका म्हणून पदावर रुजू झाल्या.

व ६५ वर्ष सेवा कार्यकाळ पूर्ण करून त्या ३१ मे २०१८ रोजी सेवानिवृत्त झाल्या. परंतु सेवानिवृत्तीचे सहा वर्ष उलटून सुद्धा त्यांना एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयाकडून एलआयसीची एक रक्कमी रक्कम मिळाली नाही. ही रक्कम मिळावी या करिता बहात्तर वर्षीय सेवानिवृत्त वृद्ध महिलेने मागील सहा वर्षापासून संबंधित कार्यालयास अनेकदा हेलपाटे मारले. परंतु कार्यालयातील कर्मचारी मात्र एकमेकांवरती बोटे ठेवून वेळ काढूपणा करित आहेत. तर आता माझे शरीर थकले असून मला आता कार्यालयास येणे जाने अशक्य आहे.

त्यामुळे माझी एलआयसीची एक रक्कमी रक्कम ही दोन दिवसात मिळावी. अन्यथा येणाऱ्या २६ जानेवारी २५ रोजी, प्रजासत्ताक दिनी मी जिथे आहे तिथेच आत्मदहन करण्याचा इशारा मुख्य कार्यकारी अधिकारी नांदेड यांच्या कार्यालयात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## आता पाणंद रस्ते घेणार मोकळा श्वास

**तभा वृत्तसेवा**
**माहुर,दि. २२ जानेवारी**

पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्यावतीने महसूल प्रशासनाला सदर कालावधीत तंतोतंत नियोजन करून प्रभावीपणे कार्यवाही करण्यासंबंधीचे निर्देश जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना प्राप्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर गाव नकाशात नोंद असतानाही काही शेतकऱ्यांचा विरोध व रस्त्यावरील अतिक्रमणामुळे ज्या शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही, अशा शेतकऱ्यांनी दि.२५ जानेवारी पर्यंत तहसील कार्यालयात अर्ज करावेत, असे आवाहन माहूरचे तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी आणि शेतीतील माल सुरळीतपणे नेण्यासाठी पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी राज्य सरकारने उपक्रम घेतले असून, त्यासाठी मोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद केलेले गाडी रस्ते, पाणंद रस्ते, शिवरस्ते, शेतरस्ते, पायवाट लोकसहभागातून मोकळे करण्यात येणार आहेत. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांचा कृती कार्यक्रम जाहीर केला आहे.यासाठी गाव पातळीवर गाव रस्ता समिती गठित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्यावतीने महसूल प्रशासनाला सदर कालावधीत या बाबत तंतोतंत नियोजन करून प्रभावीपणे कार्यवाही करण्यासंबंधीचे निर्देश जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना प्राप्त झाले आहेत.



राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतावर जाण्यासाठी, शेतातील माल वाहतूक करण्यासाठी, तसेच यांत्रिकीकरणामुळे बियाण्यांची पेरणी, आंतर मशागत, कापणी, मळणी अशी कामे यंत्रांमार्फतच केली जात असल्यामुळे यंत्रसामग्रीसह शेतीमधील कामांसाठी आवश्यक साधनांची ने-आण करण्यासाठी शेतकऱ्यांना बारमाही अतिक्रमण मुक्त रस्ते अत्यावश्यक आहेत. परंतु, गाव नकाशात नोंद असतानाही काही शेतकऱ्यांचा विरोध व रस्त्यावरील अतिक्रमणामुळे तो रस्ता वापरू दिल्या जात नसल्यामुळे, अशी पाणंद रस्ते वादात अडकून त्याविषयी भांडणे, तंटे निर्माण झाल्याच्या अनेक तक्रारी, प्रकरणे स्थानिक महसूल प्रशासनाकडे धूळखात पडली आहेत.

माहूर तालुका हा कृषीप्रधान तालुका आहे. तालुक्यातील जवळपास ७० टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. मात्र बहूतांश गावांमध्ये शेतात जाण्यासाठी पाणंद, शेतरस्ते, शिवार रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे किंवा वाद आहेत. मात्र आता सदर प्रकरणात तात्काळ कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी कालबध्द कार्यक्रम जाहिर केला आहे. आता अतिक्रमित पाणंद, शिवार रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणार असून रस्ते मोकळा श्वास घेणार आहेत.

## पतंजलीचे स्वामी यज्ञदेव महाराजांचे भव्य योग व यज्ञ प्रशिक्षण शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २२ जानेवारी**

शहरातील मोंढा मैदानावर ७ दिवसीय भव्य दिव्य योग विज्ञान,यज्ञ एवंम ध्यान शिबीर संपन्न झाले. ज्यात हरिद्वारचे संन्यासी पु. स्वामी यज्ञदेवजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ५१ कुंडी महायज्ञ व प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणा दरम्यान पतंजली योग समिती जिल्हाध्यक्ष सुरेश लंगडापुरे , पुसद तालुका प्रभारी प्रकाश वानरे, व माधुरीताई वानरे, कंधार तालुका प्रभारी निळकंठ मोरे यांनी योग प्रशिक्षण दिले. शिबिराचे मुख्य आयोजन भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव डॉ.अमोल पा.ढगे यांनी केले होते. ह्या शिबिरा दरम्यान दररोज ८ प्रकारचे प्राणायाम, ४२ प्रकारची बैठे, खडे, हाथ-पायाचे आणि पाठ व पोटावरचे सर्व कठीण- सामान्य आसने, सूर्यनमस्कार, योगीक जॉगिंग , १२ प्रकारचे तरुणांसाठी दंड आसने-बैठक, ध्यानधारणा याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी गोविंद अट्टल, शंकरराव माली पाटील, गंगाधर पाटील पुयड, आदेश जैन, गणेश मदने, गजानन करखेलीकर आदींचे योगदान लाभले. यावेळी १०० योग साधक महिला पुरुषांनी पांढरे वस्त्र परिधान करून यज्ञ प्रशिक्षण घेतले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी बालाजीराव येरावार, गंगाधर पाटील पुयड, गोविंदसेठ अट्टल, डॉ.अविनाश पा.ढगे, केदार चिटमलवार, गणेश चव्हाण, प्रल्हाद पाटील जोगदंड,पंडितराव बेंबरे,चव्हाण बुध्दाजी, गजानन करखेलीकर , गणेश देवराये गुरुजी, करखेलीकर गजानन, अक्कलवाड गणेश, गणेश मदने, कमलाकांत उत्तरवार, माधव जंगेवाड, गंगाधर कस्तुरे, विद्याताई अग्रवाल, करुणा खंडेलोटे, सुरेखा गोकावार , कविता हामंद, विजयमाला ताटीकुंडलवार, गोदावरी धानोरकर, रेणुका भुजबळे, विजया राउलवार, शकुंतला चव्हाण आदिसह परिश्रम घेतले.

### टी सी हरवली आहे

माझी आकाश देविदास जाधव या नावाची इयत्ता ८ वी पास ची देगलूर ते कु. शा. वाडी बस प्रवासादरम्यान हरवली आहे तरी कोणास सापडल्यास कळवावे.

**संपर्क**
**आकाश देविदास जाधव**
**मो. न :९७६५२८१६३१**